म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय कथा
दा. क्र. १७१७

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १७१७
IRBK-0101717

IRBK-0101717

# मनोरे—

[illegible] वाचनालय [illegible]
[illegible] १८१८ [illegible]
[illegible]

लेखिका :

कु. शशिकला आळंदकर

प्रस्तावना लेखक:

आचार्य प्र. के. अत्रे,
बी. ए., बी. टी. टी. डी. (लंडन).

IRBK-0101717

IRBK-0101717

किंमत १२ आणे

प्रकाशक—

रमाकांत वेलदे

मधुचंद्र प्रकाशन-संस्था,

मुंबई ४.

ब्लॉक—डी. बी. नेरॉय ॲण्ड कंपनी,

मुंबई ४.

कव्हरवरील चित्र—आर्टिस्ट श्री. डी. डी. दलाल.

मुद्रक—

श्री. जयशंकर खोडीदास द्विवेदी

मौज-मजाह प्रेस,

खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४.

ती. सौ. बाई

व

ती. बाबा

यांना—

—कु. शशिकला

# अनुक्रमणिका


| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| प्रस्तावना | ... | ... | ७ |
| मनोऱ्यावरून– | ... | ... | ११ |
| दोन वेडे | ... | ... | १७ |
| कोंडवाडा | ... | ... | २० |
| मधली भिंत | ... | ... | २६ |
| लग्नाची बायको | ... | ... | ३३ |
| केशाकर्षण | ... | ... | ४३ |
| कलेचें मोल | ... | ... | ४९ |
| नाटकी | ... | ... | ५४ |
| १९३६ चें कॅलेंडर | ... | ... | ५९ |
| कलावंत | ... | ... | ६७ |
| फसवं समाधान | ... | ... | ७१ |
| नीलेची परीक्षा | ... | ... | ७७ |
| गारगोटी | ... | ... | ८४ |
| उकिरडा | ... | ... | ८८ |
| भिंतीपलीकडे | ... | ... | ९१ |

# शशिकलेच्या प्रतिभेचे ‘ मनोरे ’

मी शशिकलेला तीनचार वर्षांपूर्वी प्रथम पाहिलें. सोलापूरला प्रांतिक साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष म्हणून मी तेथें गेलो होतो त्या वेळीं. शशिकला ही माझ्या एका रसिक आणि हौशी मित्राची धाकटी बहीण. लहानपणापासून ती लाडांत आणि श्रीमंतींत वाढलेली, कोणत्याही प्रकारची कमतरता तिला कधींच कोणी भासूं दिली नाहीं. घरांतले वातावरण अगदीं मोकळें आणि दिलखुलास ! त्यामुळें शशिकलेला आपल्या आवडीच्या विषयांचा अभ्यास स्वतःच्या कलाप्रमाणें आणि हौशीप्रमाणें करावयाला खूपच वाव मिळाला ! फिरायचं, नाचायचं, वाचायचं, गुणगुणायचं किंवा गायचं ! तथापि, ह्या मनमुराद खेळकरपणाचा परिणाम शशिकलेच्या मनावर अगदीं निराळ्या तऱ्हेनें झाला. ती जास्त जास्तच आत्मलक्षी आणि विचारी बनली. एकाद्या बागेंत गिरक्या घेत घेत एकाद्या फूलपांखरानें जावें आणि बाहेर येतांना त्याची गंभीर मधुमक्षिका व्हावी तसें शशिकलेचें झालें. तिच्या खेळकर वृत्तीचें पर्यवसान विचारप्रवणतेंत झालें. तिच्या आंवतींभोवतीं घडणाऱ्या गोष्टींच्या आणि दिसणाऱ्या दृश्यांच्या वरपांगी स्वरूपावर तिची दृष्टी मोहून न जातां त्यांतील मर्म शोधून काढण्याचा तिला हव्यास लागला. सदर मनोवृत्ति ही काव्यानुकूल आहे. ही काव्यात्मक वृत्ति शशिकलेमध्यें मला प्रथम आढळून आली. वास्तविक एऱ्हवी मोकळेपणानें बडबड करणारी ही भावडी मुलगी कधीं कधीं एकदम इतकी मिडस्त आणि अबोल होई कीं, कोठल्या तरी विषयावर तिचे अवधान अंतर्मुख झाले आहे अशी कल्पना केल्याशिवाय तिच्या त्या

वृत्तीचें समर्थन करतां येणें शक्य नव्हतें. तिचा हा स्वभाव मी त्याचसाठीं ओळखला. त्याच सुमारास तिचा 'छटा' हा शब्दचित्रांचा संग्रह मला वाचावयास मिळाला. त्या पुस्तकांत अंतर्भूत झालेल्या प्रत्येक शब्दचित्रांत शशिकलेच्या या विशिष्ट मनोवृत्तीचें प्रतिबिंब पहावयाला मिळते. तरुण लेखक आणि लेखिका सामान्यत: दीर्घसूत्री असतात. शब्दाचा पसारा पुष्कळसा पसरल्याशिवाय त्यांना आपलें मनोगत व्यक्त करतां येत नाहीं. थोडक्याशा शब्दांत आपला भाव व्यक्त करतां येणें ही कला सहजसाध्य नाहीं. शशिकलेच्या 'छटा' ह्या दृष्टीनें अत्यंत कलात्मक आहेत. त्यांची सूचकता आणि त्रोटकपणा प्रामुख्यानें लक्ष्यांत येण्यासारखा आहे. इतक्या थोड्या वयांत आणि वेळांत विशेष प्रयत्न न करतां शशिकलेनें हें लेखनतंत्र सहज आत्मसात् केलें ही गोष्ट तिच्या तल्लख प्रतिभेची निदर्शक आहे. आज मराठी साहित्यसंमेलनाच्या निमित्तानें '**मनोरे**' हा तिच्या लघुकथांचा संग्रह प्रसिद्ध होत आहे. मी ह्यांना 'लघुकथा' असें सर्वसामान्य नांव देतो. पण त्या सर्वच कांहीं लघुकथा नाहींत. कांहीं कांहीं निव्वळ शब्दचित्रें आहेत. किंवा त्यांना 'लघुनिबंध 'हि म्हणतां येईल ! सदर लघुकथा वा लघुनिबंध ह्या कोणत्याहि विशेष उद्देशानें लिहिल्या नाहींत ! त्यामध्यें कोणत्याहि प्रश्नांचा उहापोह केलेला नाहीं.

तथापि जीवनाकडे पहाण्याचा शशिकलेचा दृष्टिकोण काय आहे हें ह्या गोष्टीवरून कळून आल्याविना रहाणार नाहीं ! धांवत्या आगगाडींतून जाणाऱ्या प्रवाशाला डब्याच्या खिडकींतून एकामागून एक किती तरी नयनमनोहर दृश्यें दिसतात ! तो सुंदर झरा—ती रम्य वनराजी—तें डोंगर-पायथ्याच्या झाडींत अर्धवट दडून बसलेलं खेडें—ते रानांत भटकणारे गुरांचे कळप ! एका दृश्यावर नजर ठरतें न ठरतें तोंच दुसरें दृश्य नजरेपुढून पळूं लागते ! समाजांतील विविध दृश्याकडे शशिकलेनें इतक्याच तरल आणि चपल दृष्टीनें पाहिलें आहे. घराच्या खिडकींतून समोर दिसणारे आनंदी प्रणय-युग्म बघून मनाला त्या आदर्श दांपत्याबद्दल आदर वाटू लागतो तोंच तें सुखाचें दृश्य केवळ मृगजळ आहे असें आढळून येते ! रस्त्यानें जाणाऱ्या

एकाद्या सुंदर तरुणीच्या मानेवर मोरपिसाऱ्याप्रमाणें रुळणारा विपुल केश-संभार पाहून तो तिच्या संसारसुखाला केसभर देखील उपयोगी नाहीं हें वरकरणी पहाणाराला कसें कळून येणार? सोनेरी पिंजऱ्यांतल्या 'मैनांचे' मंजुळ गाणें कानाला फार मोहक वाटतें, पण समाजांत परिस्थितीच्या पिंजऱ्यांत झुरत पडलेल्या मैनांचें निःश्वास किती हृदयभेदक असतात! व्यवहारी जगांत 'कलेचें मोल' नसतें–उलट कलेला पैशाचा परधार्जिणेपणा पत्करावा लागतो—तथापि खरा कलावंत आपल्या कलेच्या समाधानासाठीं सर्वस्वाचा त्याग करावयालाही सिद्ध होतो! ढोंगी मानवी समाजांत क्वचित् 'घाणीचे उकिरडे' जाऊन त्या ठिकाणीं लक्ष्मीनारायणाची देवळेंही उभारली जातील, तथापि रूढीच्या आणि दारिद्र्याच्या चिखलांत हजारों वर्षे खितपत पडलेल्या मनुष्य जातीच्या उद्धारासाठीं जगाचें दातृत्व अद्यापिही बद्धपरिकर होत नाहीं!–अशा एकना अनेक तेजस्वी कल्पना शशिकलेच्या प्रतिभेनें ह्या गोष्टीमधून विखुरल्या आहेत, त्या बघून वाचकांची दृष्टि स्तिमित झाल्या-वांचून रहाणार नाहीं. एकाद्या लिंबाच्या झाडावर रात्रीच्या वेळीं हजारों काजवे चमकतांना दिसले म्हणजे त्या तेजानें पहाणारांचे डोळे जसे दिपून जातात, तसें ह्या संग्रहांतील इतस्ततः विखुरलेल्या शशिकलेच्या प्रतिभेचा तेजस्वी उन्मेष बघून वाचकांना वाटल्याविना रहाणार नाहीं. शशिकलेच्या मनाची ठेवण मूलतः कविची आहे हें मी वर सांगितलें आहे. तथापि, कविच्या मनांत पुष्कळ वेळा जे संदेहाचें धुकें असतें आणि ज्यामुळें कवींचें प्रकटीकरण गूढ गुंजनात्मक भासते तसें संशयाचे वातावरण शशिकलेच्या मनांत नाहीं. त्यामुळें लघुकाव्यें किंवा भावगीतें लिहिण्याचे ऐवजीं तिचें लक्ष लघुकथा लिहिण्याकडे गेले! त्रोटक, अर्थवाही आणि सुभाषितवजा अशी किती तरी वाक्यें ह्या पुस्तकांतून वेचतां येतील! शशिकलेचें अवलोकन जितकें सूक्ष्म आणि मार्मिक आहे तितकीच तिची कल्पनाहि अत्यंत तरल आहे. अगदीं साध्या साध्या गोष्टीकडे एका विशिष्ट नजरेनें बघण्याची तिची पद्धत किती अभिनव आहे? मात्र पाणीदार मोत्यांमधून एकादा

दोरा ओवला जावा त्याप्रमाणें तेजस्वी विचारांच्या मालिकेमधून उदासीन-तेचा आणि विलक्षणतेचा एक धागा धांवतो आहे असें वाचकांना आढळून येईल! त्यामुळें शशिकलेच्या वाट्याला जीवनांत 'कडवट दुःखाचा प्याला' आला आहे काय अशी विचारणा करण्याचा मोह एकाद्या चौकस वाचकाला झाल्यास नवल नाहीं! तथापि, ह्या तर्काला कोणताहि आधार नाहीं. जीवनाकडे सूक्ष्म दृष्टीनें पहाणाऱ्या माणसाचें निष्कर्ष बहुधा विषादपूर्ण असतात! उमललेल्या फुलाच्या पाकळ्यावरील रंगशोभा सामान्य माण-साला अत्यंत आल्हाददायक वाटते. पण त्या फुलांचें उमलतें सौंदर्य क्षणभंगूर आहे ही एकच कल्पना विचारी लेखकाच्या हृदयाला डांचत असते. म्हणून जगांतील रम्य आणि मनोहर गोष्टी बघून काव्यात्मक जीव नेहेमींच उदासीन बनतो. शशिकलेच्या लेखनांतील उदासीनता तिच्या मनाच्या विशिष्ट ठेवणीमुळें आलेली आहे, आयुष्यांतील अनुभवामुळें नव्हे!

साहित्याच्या क्षितिजावर शशिकलेची कोर नुकतीच कोठें उगवलेली आहे! तिच्या विकसोन्मुख प्रतिभेचे किरण आजहि मनास कितीतरी आनंद देत आहेत! चंद्राप्रमाणेंच तिच्या पूर्ण प्रतिभेच्या कला दिवसेंदिवस वृद्धिंगत होवोत आणि तिच्या पूर्ण प्रतिभेची 'पुनवेची रात' पहाण्याचें मराठी वाचकांना लाभो ह्यापेक्षां ह्याप्रसंगी दुसरी कोणती इच्छा मी करणार?

चित्रमंदिर, मुंबई.
ता. १० एप्रिल १९४१.

—प्रल्हाद केशव अत्रे.

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
दा. क्र ....... मो दि ............
वि. ........ ... क्र. ...... . .........

# मनोऱ्यावरून—

आणि त्या दिवशीं खिडकींतून त्या मनोऱ्यांकडे पहाता पहातांच मला काय वाटलं कोणास ठाऊक—मी तडक खोलीच्या बाहेर पडले, आणि चालू लागले. रस्त्यांत कुठेंहि न थांबतां मी त्या मनोऱ्याच्या पायथ्यांशीं तर येऊन पोहोंचले. हळूंहळूं मी माझी नजर वर केली.

गोल वळणाऱ्या त्या खूपच पायऱ्या...ह्या इतक्या पायऱ्या चढून वर जायचं ?—क्षणभर मी विचारांत पडले. माझ्या घराचा उघडा दरवाजा तेथूनहि मला दिसत होता. जाऊं का परत ?—इतक्या पायऱ्या चढून वर जाण्यापेक्षां...फिरून एकदां माझी नजर वर गेली...ते मनोऱ्यावरचं मोठं घड्याळ—तेथून दिसणारं आजूबाजूचं सृष्टिसौंदर्य—आणि धांवतच पहिल्या आठदहा पायऱ्या चढून गेले मी. हळूहळू उजेड कमी होऊं लागला—अन्धार

चढूं लागला. पंधरावीस पायऱ्या चढले मी—आणि इथेंच माझ्या उत्साहाची पहिली सरहद्द संपली—

मी वर पाहिलं. तेथें अधिकच अन्धार होता! वळून मागें पाहिलं. अजूनहि परत फिरणं सहज शक्य होतं. मग? फिरायचं का परत?—पुन्हां समोर पाहिलं-आणि त्याचक्षणीं निश्चय केला-आतां ह्यापुढें मागें वळून पहायचं नाहीं. बस्स! साऱ्या पायऱ्या चढून जायचंच वर. पुन्हां नव्या दमानं मी पायऱ्या चढूं लागले. वर अन्धार वाढतच होता. आणि पुढें पुढें तर दम जास्त लागूं लागला आणि जीवाची उलघाल होऊं लागली.

कांहींतरी फडफड करीत अगदीं माझ्या कानाजवळून गेल्याचा भास झाला. डोळे फाडून त्या अन्धारांत मी पाहूं लागले. भितीचे शहारे—पण इतक्यांत एका झरोक्यांतून प्रकाशाचा झोत आला आणि फडफड करणारा एकपक्षी—वटवाघूळ—होता हें पाहून मला जरा हायसं वाटलं. आणि इथेंच मी पहिला श्वास टाकला. त्या इवल्याशा उजेडांत मला दोन दगडांच्या कपारीत उगवलेलं थोडसं गवत दिसलं. काळ्याभिन्न दगडांत उगवलेलं तें नाज़ूक हिरवंगार गवत-फिरून माझं मन उल्हसित झालं. मी एकेक पायरी चढूं लागले. पुन्हा कसला तरी आवाज झाला. आणि तो आवाज अपरीचित असूनहि मी ओळखलं—हा घुबडांचा घुत्कार आहे.

मी वर जातच होते. पाय थकल्याची जाणीव क्षणाक्षणाला होत होती. आणि आतां तर स्वत: भोंवतीच फिरत असल्याचा भास मला होऊं लागला. दिशाभूल माणसाची कधींही होऊं नये, पण ती हटकून होते. मला इथें तोच संशय येऊं लागला. खरंच दिशाभूल तर नाहीं ना झाली माझी?-मी त्या अन्धारांत आजूबाजूला पाहिलं—माझ्या मनाची खात्री पटली—माझा रस्ता बरोबर होता—

पुन्हा मी हळूं हळूं चढूं लागले. पायाखालीं खूप धूळ असल्याचा भास होत होता. बाजूच्या भिंतीला मी हळूच स्पर्श केला आणि लगेच मला कळून आलं—तेथेही अनेक वर्षांची धूळ साचली आहे. पण—कां कुणास ठाऊक

त्या धूळीचा स्पर्श मला ओळखीचा वाटला. इथे मी ह्या पूर्वी कधीच नव्हते आले—सारं कांहीं नवीनच होतं मला. मग ही ओळखीची भावना...

एका छोट्या चिरीतून उजेड येत होता. आतां मला बाजूची दगडी भिंत स्पष्ट दिसत होती. वरच्या पायरीवर ठेवण्यासाठीं उचललेला पाय मी परत घेतला. मी उत्सुकतेनें पाहूं लागले. कितीतरी सह्या दिसल्या त्या भिंतीवर. प्रत्येक नांव मी अगदीं लक्षपूर्वक वाचीत होते. त्यापैकीं एक दोन नांवेंच माझ्या साधारण परिचयाची होती–आणि तरिही मला वाटत होतं—हे सारे लोक माझ्या परिचयाचे-नव्हे चांगल्याच ओळखीचे आहेत.

म्हणजे ह्या मनोऱ्यावर ह्या पूर्वी पुष्कळजण येऊन गेले आहेत तर ! मी एकटीच नाहीं हा मनोरा चढणारी—आणि ह्या विचाराबरोबर माझ्या मनाला थोडा धीर आला. वाढत्या आशेनं आणि नव्या दमानं मी फिरून पायऱ्या चढू लागले.

भिंतीवरची ती नांवं अजूनहि माझ्या डोळ्यापुढें दिसत होती–खरंच कां बरं इथे त्या लोकांनीं आपलीं नांवं लिहिली ?–मनोरा चढण्याचं धैर्य दाखवलं म्हणून ?—हं ! त्यांत काय मोठंसं. मी नाहीं का आतां चढून जात ?—मग काय—आपलं नांव कोणीतरी वाचावं–म्हणजे निव्वळ प्रसिद्धिची हांवच नव्हे तर काय ?- ह्या अन्धारांत समोर कोणी नसतांनाहि तोंड मुरडून मी माझी नापसंती दर्शविली.

—पाय थकले होते आणि तरिही मी चढत होते, पण आतां पाय उचलणंहि अशक्य झालं. पायाची बोटं वळू लागली. त्या भिंतीवर सांचलेल्या धुळीचा मला विसर पडला नव्हता–आणि तरिही थकलेल्या शरीरानं भिंतीचा आधार घेतला. त्या अंधारांतहि मी डोळे घट्टघट्ट मिटून घेतले–माझाच हात तोंडावर घट्ट दाबून धरला–श्वास कोंडला गेला. कशाला–कशाला आले मी इथं ?–जाऊ का परत ?—

—पण आतां परत–इतकं चढून आल्याबर अपयश–पराजय घेऊन परत जायचं ? काय कसं मग ?

आणि त्याचक्षणीं कुठून तरीं हळूच एक वाऱ्याची झुळूक आणि... हळूहळू मी डोळे उघडतांना—माझ्या किलकिल्या डोळ्यांना प्रथम दिसलं असेल तर तें रेघोट्यांनीं लिहिलेलं नांव !

मी डोळे पूर्ण उघडले. अगदीं भिंतीजवळ तोंड नेऊन मी तरी अक्षरं वाचलीं मात्र—माझ्या तोंडावर हास्य उमटलं. सारे श्रम नाहींसे झाले. फिरफिरून मी तें नांव वाचलं. हळूंहळूं माझ्या शरिरांत चैतन्य आलं. माझ्या गळाटलेल्या पायांत जीव आला—मनोऱ्यावर चढणाऱ्या दुसऱ्या जीवांना धीर देण्यासाठीं लिहिलेली ती अक्षरं—स्वतःचं नांव लिहिणाऱ्या जीवाचा उदात्त हेतु आतां माझ्या लक्षांत आला. मीहि आजुबाजूला पाहिलं. पण मला कांहींच सांपडलं नाहीं. शेवटीं मी खालीं वाकले आणि त्या धुळींतच मी माझं नांव थरथरत्या हातानें लिहिलं. त्याचवेळीं मला माणसांच्या पाऊलाच्या खुणा स्पष्ट दिसल्या—आतां ह्या खुणावरून मनोरा सहज चढून जाईन मी—आणि मलाच नकळत समाधानाचा सुस्कारा बाहेर पडला.

लहानपणीं लपंडावाच्या खेळांत डाव अंगावर येऊं नये म्हणून ज्या ईर्षेनें आणि हिरहिरीनें मी धांवत असे त्याच ईर्षेनें—एकेक—दोन दोन—पायऱ्या सोडून धांवतच मी वर जाऊं लागले. किती उल्हसित झालं होतं मन त्यावेळीं !—आणि नेमकं त्याचवेळीं मला वरच्या झरोक्यांतून आकाशाचा गर्दगर्द निळा रंग दिसला. आतां त्या अमर्याद उत्साहाची जागा शान्तीनें घेतली. माझा वेग कमी झाला. आतां अगदीं शांतपणें मी एकेक पायरी चढूं लागलें.

एक—दोन—तीन—आणि चार ! फक्त चारच पायऱ्या—त्या चढून गेलं कीं कंटाळवाण्या पायऱ्यांची बेरीज संपेल—आणि मग—ती चीड—ती हूर-हूर—तो थकवा सारं कांहीं संपेल. क्षणभर मी त्याच पायरीवर थांबले—आणि अभिमानानें मागें वळून पाहिलं. इतक्या पायऱ्या टाकून मी इथपर्यंत आले—हं आतां पुढें ?

मी समोर पाहिलं. मनोऱ्यावर नेऊन सोडणारा तो भव्य दरवाजा ! मी

शांत मनानं एकेक पायरी चढूं लागलें—आतां मी शेवटच्या पायरीवर पोहोंचले. त्या भव्य दाराच्या चौकटीवर हात ठेऊन मी क्षणभर उभी राहिले आणि समाधानाचा शेवटचा सुस्कारा मी इथेंच टाकला—मागच्या साऱ्या आठवणी इथेंच संपल्या—!

जगाचा रंग मला कधींही ओळखता आला नाहीं—पण आज हा मनोरा माझ्या मनाला इंद्रधनुष्याचें सुंदर सुंदर रंग दाखवीत होता. रोज जगाचे अनंत संदेश घेऊन येणारे ढग कसे अगदीं माझ्याजवळ आले होते.

मी हळूंच बाहेर कठड्यांत पाऊल टाकलं–आणि तोंच आंवतीभोंवतीची पाखरं भुर्रकन् उडून गेली. मला वाईट वाटलं. मनांतल्यामनांत मी त्यांना सांगू लागले—"मी तुम्हाला त्रास देणार नाहीं. कांहीं–कांहीं सुद्धां दुःख देणार नाहीं—" पण—तें त्यांना ऐकू गेलं नाहीं आणि उडून गेलेली पाखरं परत आली नाहींत.

आपोआपच माझी मान खालीं झाली. कसली तरी टिकटिक मला ऐकूं आली—मी वर पाहिलं. तें मनोऱ्यावरचं घड्याळ ! फिरून अजून जरा माझी मान खाली करून मी कानोसा घेतला—त्या शांत ठिकाणीं माझ्या हृदयांतला आवाज कसा अगदीं स्पष्ट ऐकूं येत होता—

मी चटकन् मान वर केली–मनोऱ्यावरचं तें घड्याळ—

तें घड्याळ आणि मी एकच असंच वाटत क्षणभर आणि मनोरा ?–मनोरा आणि मीसुद्धां एकच का ?

खरंच. स्वतःचं शरीर म्हणजे सुद्धां एक चालतां बोलतां मनोराच नाहीं का ? ह्या मनोऱ्यांत काय आहे आणि काय नाहीं ? जगांतली सारी आश्चर्यें इथें एकवटली आहेत. सात नव्हे–सत्तर वेळां—नव्हे सातशें वेळां ह्या मनोऱ्यांत सारखा आवाज घुमत रहातो. उंची साडेतीन हातच असली तरी इच्छा असली तरी तें वाटेल तितक्या उंचीवरही जाऊं शकतं—

प्रेमाचं प्रतीक म्हणून ताजमहालचा दगडी मनोरा उभा आहे. सारं जग त्या मनोऱ्याकडे कौतुकानें पहातं–मनोरा त्याहूनहि श्रेष्ठ नाहीं का ?—

हाच एक मनोरा जगाच्या मनोऱ्याला पाहून कौतुकानं अत्यानंदीत होऊन त्याच्या निर्माणकर्त्याला वन्दन करण्यासाठीं हातहि जोडू शकतो. तंत्र, मंत्र आणि यंत्रहि जिथें हात टेकतात असा हा एकच मनोरा आहे—साऱ्या मनोऱ्यापेक्षांहि सुन्दर, गूढ, अगम्य आणि पुन्हा जीवन्त !

तीनशें फुटावरून पडणारं पाणी आडवता येतं—पण डोळ्यांतून वहाणाऱ्या अश्रूंच्या धारा आतांपर्यंत कोणाला आडवितां आल्या आहेत का ?—हिमालयासारख्या ठिकाणीं जाऊनहि नद्यांचं मूळ शोधतां आलं. पण ह्या अश्रूंच्या मूळाचा शोध कुणाला लागला आहे का आजपर्यंत ?

महासागराची खोली माणसांनीं काढली–पण मानवी मनाची खोली अद्याप कुणाला अजमावतां आली आहे का ?

अनंताचे अनंतत्व आणि क्षुल्लकाचे क्षुल्लकत्वहि इथं दोन मनाच्या रुपानीं एकजीव झाली आहेत.

गूढ आणि अगम्य असा एकच हा मनोरा ! निरनिराळ्या रुपानं व रंगानं या साऱ्या जगांत व्यापून राहिला आहे, नाहीं का ?

मी हळूच खालीं वाकून पाहिलं. मनोऱ्याच्या पायथ्याजवळ वावरणारी माणसं वरून किती लहान दिसत होती !—पण त्या लहान दिसणाऱ्या जीवाचं सामर्थ्य–माझे हात जोडले गेले. आणि भक्तिभावानें मी त्यांना वन्दन केलं.

साऱ्या गोष्टींचा विसर पडला होता–फक्त एकच जाणीव उरली होती—मी आणि मनोरा–मी आणि घड्याळ–घड्याळ आणि मनोरा सारं—सारं एकच !

# दोन वेडे

"ते बघ"—मोहनच्या बोटाच्या अनुरोधानें मी पाहूं लागले. एक वेडा समुद्राकडे पहात मोठमोठ्यानें बडबडत होता. त्याच्या एकंदर आविर्भावावरून तो शिव्या देत असावा. समुद्राला अन् शिव्या? मला हसूं आलं.

इतक्यांत वेड्यानं समुद्राकडे पहात कडाकड स्वत:चीच बोटं मोडली. आणि डोळ्याचं पात लवतं न लवतं तोंच एकाच पायांत असलेली फाटकी-चप्पल हातांत घेतली आणि जोरानें समुद्रांत भिरकावली. पुन्हां एकदां हाताची बोटं मोडली-डावा पाय जोरानें जमिनीवर आपटला. तो अजून जरा पुढें सरकला आणि समुद्रांत वाकून पाहूं लागला. हा वेडा समुद्रांत उडी तर नाहीं घेणार? मला भिती वाटली. पण लगेच तो मागें सरकला—पुन्हां वाकला, समुद्रांत एकदां थुंकला आणि झटक्यानें मागं फिरून चालू लागला.

त्याचं बडबडणं चालूच होतं. मधूनच तो वळून समुद्राकडे पाही–बोटं मोडी– पाय आपटी.

" दुर्दैवी बिचारा ! " मी सहजच उद्गारले.

" कोण दुर्दैवी ?–एवढ्या अफाट समुद्राला शिव्या देणारा दुर्दैवी ? साऱ्या दुनियेचं सामर्थ्य ज्याच्या जवळ तो कसला दुर्दैवी ? " कसलं विचित्र बोलणं हें मोहनचें ! मी मोहनकडे पाहिलं. अगदीं एकाग्रतेनं मोहन त्या वेड्याकडे पहात होता. वेडा दृष्टी आड झाला. एकच अस्पष्ट सुस्कारा— आणि लगेच मोहननी मोटर सुरु केली. आम्ही दोघंहि स्तब्ध होतो. माझ्या डोक्यांत त्या वेड्याचेच विचार घोळत होते. अथांग समुद्राकडे तिरस्कारानें पहाणारं हृदय केवढं निर्भय—पण छे ! बोलून चालून वेडयाचे अर्थशून्य चाळे-त्यांत कसली निर्भयता ? पण–पण समुद्रावरच त्याचा एवढा राग कां ?–किंवा समुद्राच्या तळाशीं दडलेल्या वस्तूंतच त्याच्या वेडाचं कारण---कदाचित् त्याचं कोणी समुद्रांत बुडून...... मोटारीच्या वेगाबरोबर माझ्या कल्पनेचा वेगहि वाढत होता. पण इतक्यांत--वेगांत असलेली मोटार एकदम थांबली. मी चटकन् मोहनकडे पाहिलं. न बोलतांच त्यानें दृष्टीनें खुणवलं. मी बाहेर पाहूं लागले. अगदीं शांत होता समुद्र–मग पहाण्या-सारखं काय...इतक्यांत माझं लक्ष समुद्राकडे तोंड करून बसलेल्या माणसाकडे गेलं. गळ्यांत सुकलेल्या फुलांच्या बऱ्याचशा माळा. दंडांत, हातांत सुकलेल्या फुलांचे गजरे. कपाळावर, कमरेवर बांधलेल्या पानांच्या माळा. नक्कीच वेडा.

" आज हें आहे तरी काय ? तो वेडा–हा वेडा—"

" तूं वेडी–मी वेडा " मी हंसूं लागले. पण मोहन अगदीं गंभीर होता. त्याची दृष्टी त्या वेडयावर खिळली होती. मीहि त्या वेडयाच्या विचित्र लीलाच निरीक्षण करूं लागले.

त्यानें हात जोडले होते. कांहीं तरी पुटपुटत होता. मध्येंच तो उठून उभा राहिला. स्वतःभोंवतींच एकदां फिरला. गळ्यांतली सुकलेल्या फुलाची

एक माळ काढली. दोन्ही हाताच्या ओंजळींत ती घेऊन भक्तिभावानें समुद्रांत टाकली.

गुडघे टेकले. आणि तेवढ्याच अपुऱ्या जागेंतच खालीं वाकून नमस्कार केला. पुन्हा उठला. गळ्यांतून दुसरी माळ काढली. पहिल्याच भक्तिभावानें ती समुद्राला अर्पण केली, नमस्कार केला, तिसरी माळ काढली.

मी मोहनकडे पाहिलं. त्या वेड्यावर खिळलेली त्याची ती निश्चल पण केविलवाणी नजर—कसं तरीच वाटलं मला.

"चल ना आतां" वेड्यावरची तीच दृष्टी क्षणमात्र माझ्यावर खिळली. माझी भेदरलेली नजर आणि कांपरा आवाज—

"चल. वेडी कुठली. भ्यायला काय झालं?" तो पुन्हां त्या वेड्याकडे पाहूं लागला. मला अगदीं असह्य झालं. "नकोरे. चल ना आतां." मोठ्या कष्टानें मोहननें त्या वेड्यावरची दृष्टी काढली. मोटार चालू झाली. दोघंहि स्तब्ध होतो. मोहननें शांततेचा भंग केला—"उषा, तुला कुठचा वेडा आवडला. समुद्राला शिव्या देणारा तो पहिला कीं, पूजा करणारा हा दुसरा?"

"इश्श. कांहींतरीच! त्यांत काय आवडायच?—बोलूनचालून वेड्याचे चाळे. त्यांत कसला अर्थ?" पण ओठाशीं आलेले शब्द तसेच परतले. दोघंहि वेडेच खरें. पण त्यांच्या त्या वेडांतहि केवढं अंतर? एकाची ती उत्कट भक्ति आणि आदर दुसऱ्याचा तो आत्यंतिक तिरस्कार?

खरंच वेडाचेच का हे प्रकार?—मोहन मला पुन्हा विचारीत होता—

"सांग ना—कोणता वेडा आवडला तुला?"

---

# कोंडवाडा

कल्पनेच्या अंधारांत चमकणाऱ्यांना तारा म्हणतात—सत्य जगाच्या सजीवतेंत ताऱ्यांना दगडाचें स्वरूप येतें.

त्याच दगडानें मंदीर बांधलें जातें अन् कोंडवाडाहि—मंदीरांत दगडाचा देव–आणि–आणि कोंडवाड्यांत दगडांनीं बांधलेले जीव !

तो एक कोंडवाडा होता. जनावरांनीं तो कसा अगदीं नेहमीं गजबजलेला असे. सैरावैरा हिंडणाऱ्या उनाड जनावरांना तेथें आणण्यांत येई. कित्येक वेळीं रस्ता चुकल्यानें बावरलेलीं जनावरं सरकारचें शान्तिदूत तेथें आणून सोडीत, अन् निघून जात—भरभक्कम भिंतीच्या कोंडवाड्यांतून त्या प्राण्याचें श्वास देखील बाहेर येत नसत.

कोंडवाड्याच्या त्या दगडी भिंती पहातांच त्या मुक्या प्राण्यांना स्वतः-

वर कोसळलेल्या संकटाची जाणीव होई—त्याचं भान नाहीसं होई–सारा जीव कंठांत आणून तीं ओरडत आणि त्या कोंदट अंधाऱ्या कोंडवाड्यांत धांवण्यास सुरुवात करीत—

सारा कोंडवाडा त्या मुक्या जनावरांच्या किंकाळ्यानें हादरून जाई. कोंडवाड्याच्या रखवालदारास त्या ओरडण्याचा त्रास होई आणि मग चांगल्या बळकट काठ्यांनीं त्या जनावराची पाठ शेकली जाई!—जीव जग-विण्यापुरता चारापाणी त्या ठिकाणीं त्या जनावरांना कांहीं विशिष्ट काळा-पर्यंत पुरविला जाई—आणि नंतर?—

त्यापैकीं कांहीं जनावरांचे दयाळू धनी त्या ठिकाणीं शोध काढीत येत आणि आपल्या मालकिची वस्तु घेऊन परत जात. घरीं जातांच त्या जना-वरांच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरवीत–प्रेमाची धमकी देत–" हं पुन्हां असं कधीं चुकू नको–सांगून ठेवतो ". धन्याची भाषा समजलेली ती मूक जनावरं मात्र एकदां खालीवर करून धन्याचे हातपाय चाटीत. कृतज्ञता–प्रेम व्यक्त करण्याचा एकमेव मार्ग होता तो त्यांचा !

पण हें असलं थोर भाग्य फार थोड्यांच्या वाट्याला येई–दुसरे कांहीं धनी केवळ स्वतःच्या स्वार्थासाठीं आपल्या जनावरांना घेऊन जाण्यासाठीं त्या ठिकाणीं येत. दंड भरतांना त्यांच्या कपाळावर पडलेलें ते आठ्यांचं जाळं!–

त्या मूर्ख जनावरांच्या चुकीमुळें त्यांच्या खिशाला लागलेली झळ—त्यांचा संताप अनावर होई–आणि मग घरीं पोहोंचेपर्यंत त्या जनावरांच्या पाठीवर कांठ्यांचे तडाखे बसत !

—खाली मान घालून ते मरणप्राय दुःख देणारे तडाखे शांतपणें सहन करीत तीं आपल्या घरीं जात. स्वतःच्या चुकीसाठीं शांतपणें प्रायश्चित घेणाऱ्या ध्येयवादी वीरांचा धीरोदात्तपणा त्यांच्या डोळ्यांत त्यावेळीं दिसून येई !

पण कोंडवाड्यांत मागें राहिलेल्या बेवारशी जनावरांची संख्या पुष्कळच असे–आणि त्यांचा शेवट? तो मात्र भयंकर असे? कांहीं दिवस त्यांच्या मालकांची वाट पहाण्यांत येई—आणि शेवटीं एका ठरलेल्या दिवशीं त्या

मुक्या प्राण्यांच्या लिलावाची तारीख काळ्या फळ्यावर पांढऱ्या खडूनें लिहिली जाई !

चारा पाण्याच्या अभावानें हाडं निघालेल्या त्या जनावरांना विकत घेण्यासाठीं येणार कोण ?

लिलावांस हजर असलेल्या लोकांत कसायांचा भरणाच खूप असे. आणि मग एकाच दाव्यानें चार चार पांच पांच जनावरांना बांधून कसाई-खान्यांत नेण्यांत येई—स्वत:चा भीषण शेवट समजलेली तीं मूक दुर्दैवी जनावरं, निराश दृष्टीनें इकडे तिकडे पहात मागोमाग जात. त्यांना आशा वाटे--" कदाचित् आपला धनी रस्त्यांत भेटेल, आपल्याला घेऊन जाईल, आपला मृत्यु चुकेल ! " खुळे जीव !

त्या जनावरांत कित्येक लहान लहान वासरं असत. त्यांच्या डोळ्यापुढें त्यांची आई दिसूं लागे—तर कित्येक आयांना त्यांच्या पाडसाची आठवण होई—जीव कासावीस होई. त्यांचे पाय वाकडे तिकडे पडूं लागत अन् मग नीट सरळ रस्त्यानें चालावं म्हणून त्यांच्या पाठीवर कधीं चाबकाचा तर कधीं काठ्यांचा मारा सुरु होई !

निराशेनें काळवंडलेली जनावरं शेवटीं कसाईखान्यांत येऊन दाखल होत. छोटयाशा चुकीसाठीं त्याठिकाणीं त्यांना प्राणाचं मोल द्यावं लागे !

आणि अशातऱ्हेनें भरलेला कोंडवाडा क्षणमात्र रिकामा पडे. पण पुन्हां दुसरे दिवशीं नवी चुकलेली जनावरं तेथें आणण्यांत येत अन् जुन्या जना-वरांची जागा भरून काढीत--कोंडवाडा पुन्हां कसा अगदीं फुललेला दिसे !

× × × ×

—मोह आणि अनिवार अधीरता हीच तारेची चूक. नवेपणाची हौस हाच सुधांशुचा आनंद ! सुधांशुच्या सहवासांत तारा बेफाम होई. साऱ्या जगाचा तिला विसर पडे. तिचा जीव उंच उंच मनोरे उभारण्यांत रंगून जाई.

प्रेमाच्या त्या गोड धुंदींत सुधांशुच्या दुष्टबुद्धीचे खोल डावपेंच तिला

फुटून समजणार ?—आणि सुधांशुच्या चंचल चातुर्यांत शेवटीं तारेची उल्का झाली !

आई–बाप, बहीण–भाऊ, नातंगोतं सारं कांहीं तिनं पार झुगारून दिलं—

त्यागाचा क्षणभर चकचकाट झाला !—तो दिव्य प्रकाश ! ! सुधांशु बरोबर प्रेम–मंदिरांत निघून जातांना तारा त्या क्षणाच्या दिव्य प्रकाशानें भारून गेली. तिचं भान तिच्यांत नव्हतं राहिलं. सभोंवतालचं जग ओरडत होतं—'तारा, बेशरम स्त्री—निव्वळ दगड !'

तारेला जगाचा राग येई. तिला वाटे—'खऱ्या प्रेमाला लग्नाचं दुबळं बंधन कशाला ? माझा सुधांशु'—त्या वेळीं तिच्या डोळ्यांत सर्व जगाविषयींचा तिरस्कार दिसून येई.

अधिकाराच्या हक्कांत मोहाला प्रीतीचं पावित्र्य येतं, पण ह्या साध्या गोष्टीचा त्या प्रेमवेड्या जीवाला थांगपत्ता नव्हता. साऱ्या जगाचं प्रेम–पावित्र्य तिला सुधांशुच्या डोळ्यांत दिसून येई—आणि मग—

दगडाचा देव आणि त्या देवाच्या प्रतिमेकडे डोळ्यांत प्राण आणून पहाणाऱ्या भक्ताचा उमाळा, एकनिष्ठपणा तारेच्या डोळ्यांत दिसून येई. पण शेवटीं—

—दगडाच्या देवाकडून भक्ताचा न होणारा विश्वासघात तिच्या प्रेम–मंदिरांतल्या प्रीति परमेश्वरानें केला— !

सुखाचा—स्वर्गसुखाचा उपभोग घेण्यासाठीं तिनं साऱ्या जगाचा त्याग केला होता. त्या वेळीं त्यागाची धुंदी तिच्यावर चढली होती.

आणि आतां–उपभोगाच्या सफलतेनंतर त्यागाची धुंदी सुधांशुवर पडली. आणि त्याच धुंदीत–क्षणांत तारेच्या प्रेम–मंदिराचं रुपान्तर कोंड–वाड्यांत झालं !

तिला तिच्या घरापुढचा कोंडवाडा दिसूं लागला...त्या जनावरांचे होणारे ते निरनिराळे शेवट !

तिच्या डोळ्यापुढं आशा नाचूं लागली...आणि प्रेमाची माणसं येतील–ह्या कोंडवाड्यांतून सुटका करतील. आपल्याला पुन्हा आपलं पहलिं स्थान मिळेल—

वेडी तारा ! जगांतलं एक कटु सत्य अजून तिला कळलं नव्हतं—चुकलेल्या जनावरावर त्यांचे मालक दया दाखवतील—कोंडवाड्यांतून त्यांना घरीं घेऊन जाईल. पण--

चुकलेल्या माणसांवर–त्यांहून स्त्रीवर केव्हांच दया केली जात नाहीं. काठीचे तडाखे सहन करूनहि तिला पहिलं ठिकाण मिळत नाहीं. जगाच्या सहानुभूतिला ती कायमची पारखी होत.

डोळ्यांत प्राण आणून ती आपल्या आईबापाची वाट पहात होती. एकेकाळीं जगाकडे तिरस्कारानें पहाणारी नजर–आतां त्या नजरेंत जगाच्या सहानुभूतीची भूक होती. नातलगाच्या भेटीची आतुरता होती.

पण तिची आई आपल्या चुकलेल्या पाडसासाठीं धांवत आली नाहीं. तिच्या बापानें तर तिचा निरोप ऐकण्याचेहि पाप नाहीं केलें.

स्वत:च्या स्थानापासून किंचित् ढळतांच आकाशांत दैवी तारकासुद्धां क्षणांत गारगोटी नाहीं का होत ?—

त्यांना तरी ह्यांचं हरपलेलं स्थान कधीं तरी मिळतं का ?–तारेला पूर्णपणें कळून आलं—

क्षणाच्या मोहांत शील गमावून बसलेल्या स्त्रिला जगाच्या अंतापर्यंत शीळा होऊन जगाच्या पायदळीं पडून रहावं लागलं-चंचलतेला पळवाट काढतां येते—पण ती कुणाला ? पुरुषाला–स्त्रीला नव्हे !

तिच्या नजरेपुढें कसाईखान्यांत जाणारीं जनावरं दिसूं लागलीं. तिला समजेना—

आपला शेवट असाच नाहीं ना ? पण त्यासाठीं तिला फार दिवस वाट पहावी लागली नाहीं.

तिचा शेवट होण्याची आतां वेळ येऊन ठेपली.

तिच्या लिलावाची बातमी भर रस्त्यावर लावली गेली नाहीं तरीहि तिचा लिलाव झाला !

वाट चुकलेल्या स्त्रिला विकत घेण्यासाठीं दुसरं कोण येणार ?

लिलावांत मांडलेली वस्तु—प्रत्येकाला आपल्या मर्जीनुसार तिची किंमत करण्याचा अधिकार—शेवटीं सौदा पटला—सुधांशुच्या हातांत नोटा पडल्या--तारेची मालकी एका श्रीमान् वेश्येकडे गेली ! एका सुंदर सर्व सुखसोईनीं सज्ज महालांत तिला नेण्यांत आलें. त्याठिकाणीं जगांत जगण्याचा अधिकार तिला देण्यांत आला--जनावरांच्या कसाईखाना आणि हा महाल--केवढा फरक--केवढं साम्य !

म. ग्रं. सं. ठाणे वाचनालय शाखा.
दा. क्र. सा. दि. ...........
वि. .. .. ..........

# मधली भिंत

त्या दिवशीं सकाळीं कसल्यातरी आवाजानें मी झोपेंतून जागी झालें. कोणाच्या तरी हातांतून कपबशी निसटली असावी आणि ही शंका मनांत येते न येते तोंच कांहीं विशिष्ट मुलींचा हंसण्याचा तो ओळखीचा आवाज कानीं पडला. क्षणांत मी ओळखलं–नक्की सरोजनें कांहींतरी पराक्रम गाजवला आहे.

मी उठून खोलीबाहेर आले. खोलीच्या दारांतच सरोज फुटलेल्या कप-बशीचे तुकडे गोळा करीत होती. जवळच चार हाताच्या अंतरावर आमच्या हॉटेलमधली ती पांचजणींची प्रसिद्ध टोळी—विमल-आशा-शांता आणि मंडळी–हंसत आणि कांहींतरी कुजबुजत उभी होती. मी सरोजकडे

पाहिलं. ते काचेचे तुकडे गोळा करतांना तिचे हात थरथरत होते. डोळे पाण्यानें भरून आले होते. इतक्यांत माझं लक्ष तिच्या उजव्या हातावर गेलं. आंगठ्यांतून वहाणारी ती रक्ताची धार! मी जवळजवळ ओरडलेच—
" राहूंदे–राहूंदे ते सरोज, रामा गोळा करील ते सारे तुकडे. उठ तूं."

" हो. आणि कुणाच्या पायांत गेली म्हणजे कांच–म्हणे राहूं दे—" मला प्रत्येक शब्दन् शब्द स्पष्टपणें ऐकूं येईल अशा आवाजांत आशा पुटपुटली.

केविलवाण्या नजरेनं सरोजनं माझ्याकडे एकदां पाहिलं आणि तुकडे गोळा करण्यासाठीं ती पुन्हां खालीं वाकली.

" राहूंदे म्हटलं ना—" माझा आवाज बराच चढला होता, " चल, उठ." आणि नंतर आशेकडे पहात मी अगदीं शांतपणें विचारलं—
"आशाबाई, तुमच्या हातूनहि कपबशा फुटल्या आहेत–त्यावेळीं तुम्हीच काचेचे तुकडे गोळा केले आहेत का?"

तिच्या प्रत्युत्तराची वाट न पहातां मी सरोजला घेऊन खोलींत आले. ओल्या फडक्यानं मी तिच्या बोटाचं रक्त पुसून काढीत होते. बोट बरंच चिरलं होतं. बाहेरची ती कुजबुज अजून थांबली नव्हती. मधून मधून हंसण्याचाहि आवाज ऐकूं येत होता. तिकडे लक्षच नसल्याचं मी दाखवीत होते. पण सरोज मात्र त्या हंसण्याच्या आवाजाबरोबर कावरीबावरी होई. तिची नजर केविलवाणी दिसूं लागे.

पण हा कांहीं पहिलाच प्रसंग नव्हता. गेल्या चार-महिन्यांत–सरोज हॉस्टेलमध्यें रहायला आल्यापासून असले प्रसंग नेहमींच येत. तिच्या हातून कांहीं चूक झाली नाहीं आणि मुली हंसल्या नाहींत असा दिवस क्वचितच उगवे.

तसंच पाहिलं तर सरोज खरोखरच फार चांगली मुलगी होती. कोणाशीही वागतांना बोलतांना तिच्या स्वभावांतला स्वाभाविक मोकळेपणा, प्रेमळपणा दिसून येई. पण असं असूनहि सरोज म्हणजे एक थट्टेचा विषय झाली होती आमच्या हॉस्टेलमध्यें. अर्थात् त्याला कारण हें होतच.

अगदीं साधं काम देखील सरोजला नीटपणें करता येत नसे. कॉलेजच्या मुलींचं हॉस्टेल तें. काम असणार कसलं तिथं?–स्वतःचा चहा स्वतः तयार करणं–कपबशी विसळून ठेवणं आणि स्वतःच्या कपड्याच्या घड्या करणं. पण ही असली साधी, रोजच्या व्यवहारांतली कामं देखील तिला नीटपणें करतां येत नसत. लुगड्याची साधी घडी. पण ती करण्यासाठीं सरोजला पक्की वीस मिनिटं पुरत नसत. आणि इतका वेळ घेऊनहि केलेली ती घडी पहातांच कोणालाहि हंसूच यावं. साधी कपबशी—पण ती विसळतांना तिची कोण तारांबळ उडे! त्यांतून तिच्यावर खिळलेली मुलींची ती तीक्ष्ण नजर. ती ज्यास्तच बावरून जाई. तिच्या हातून हटकून चूक होई. आणि मग मुली तिची वाटेल तशी चेष्टा करीत. हळूहळू सरोज म्हणजे एक करमणुकीचं साधन, चेष्टेचा विषयच झाला.

प्रयत्न करूनहि काम करणं साधत नाहीं हें सरोजप्रमाणें माझ्याहि लक्षांत येऊन चुकलं. मुलींच्या तावडींतून निसटण्याचा मार्ग मीच शेवटीं शोधला. एकादी मोलकरीण काम करण्यासाठीं ठेवल्या खेरीज तिची होणारी टिंगल थांबणारी नव्हती.

पण मनुष्य करायला जातो एक आणि होतं भलतंच. अगदीं तस्साच प्रकार झाला. सरोजनें मोलकरीण ठेवली मात्र–एकच भडका उडाला. चोंहोंकडून बोंचक शब्दांचा मारा तिच्यावर सुरू झाला. हॉस्टेलच्या कोना-कोपऱ्यांतून फक्त निंदेचे सूर निघूं लागले. सगळ्यांची खात्री झाली—केवळ स्वतःच्या श्रीमंतीचं प्रदर्शन करण्यासाठीं सरोजचा हा सारा प्रयत्न चालू आहे! आणि निव्वळ श्रीमंतीचा डौल दाखविण्यासाठीं हॉस्टेलमध्यें आलेल्या सरोजला योग्य धडा देण्यासाठीं बऱ्याच मुली पदर खोंचून तयार झाल्या.

त्या दिवशीं तर कमालच केली सरोजनें. मोलकरणीनें दाराबाहेर धुवून ठेवलेली कपबशी खोलींत आणतांना तिनें फोडली होती. कां हसणार नाहींत मग मुली?–

वास्तविक प्रत्येकाला आपल्याला स्वतःपुरती का होईना, पण असलीं

साधी कामं करितां आली पाहिजेत. अगदीं खरं. आणि सरोजलाहि तें पसंत होतं. त्याप्रमाणें तिनें बराच प्रयत्न केला. नाहीं अस नाहीं—पण प्रयत्न करूनहि तिला तें नाहीं साधलं. चूक सरोजची नव्हती. श्रीमंत बापाची लाडकी पोर. अगदीं साध काम करण्याचा देखील तिच्यावर कधीं प्रसंग नव्हता आला. हातापायाला नोकर आणि ह्या अशा परिस्थितींत–वयाचीं अठरा वर्षं गेल्यावर एकदम काम करणं तिला नाहीं साधलं तर त्यांत नवल नव्हतं. पण एवढा विचार करतं कोण?—तिचं वागणं योग्य वाटतंहि होतं थोड्या मुलींना. पण बहुसंख्या तिला दोष देणारीच होती. त्यांचं एकच म्हणणं— ती सुमन, कलेक्टर तिचा बाप. किती श्रीमंत पण तीसुद्धां सारं काम स्वतः करते. ते कांहीं नाहीं निव्वळ ढोंग आहे सरोजचं—

सुमनला जें साधलं तें सरोजला का साधूं नये?—प्रश्नाचं उत्तर देणं कठीण होतं. आणि ह्या सर्वांचा शेवट शेवटीं असा झाला.

कपबशी फुटल्याचा प्रसंग घडून दोन तीन दिवस लोटले होते. त्या दिवशीं हॉस्टेलमध्यें मेजवानीचा बेत होता. प्रत्येकीनें कांहीं किरकोळ कामं स्वखुषीनें स्वतःकडे घेतली होती. मेजवानीचा बेत उत्तम साधावा म्हणून प्रत्येकजण आपल्या परीनें प्रयत्न करीत होती. आणि एकंदर बेत साधलाहि उत्तम. गप्पागोष्टी आणि हसण्याखिदळण्यांत जेवण अगदीं रंगांत आलं होतं. इतक्यांत, जेवतांना गाणं म्हणण्याची सूचना पुढें आली आणि सर्वांनाच एकदम सरोजची आठवण झाली. आवाज मूळचाच गोड आणि ती गात पण असे छानच. इतका वेळ कोणाच्याच लक्षांत आलं नव्हतं—सरोज जेवायला आली नव्हती. आतां मात्र सर्वांनाच तिची उणीव भासली.

वॉर्डननीं जरा आश्चर्यानेंच सरोज जेवायला कां नाहीं आली म्हणून मला विचारलं. मला कांहींच सांगतां येईना. गडबडींत असल्यानें माझ्या लक्षांत सरोजची गैरहजेरी आली नव्हती. पण इतक्यांत "त्या नाजूक युवराज्ञीचं म्हणे डोकं दुखतंय्—" शांतानें माहिती पुरवली.

मी मनांत ओळखलं—सरोजच्या हातून कांहींतरी चूक घडली असणार. तिच्यावर सोंपविण्यांत आलेलं काम...

जेवण होतांच मी सरोजच्या खोलींत गेले. डोकं उशींत खुपसून सरोज़ पडली होती.

" डोकं दुखतंय् होय सरोज ? " पण तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

" सांग ना—डोकं दुखतय् ? " तरीही ती गप्पच राहिली. मी तिच्या तोंडावरची उशी दूर केली. दाबून धरलेला जोराचा हुंदका बाहेर पडला. रडून रडून तिचे डोळे खूपच लाल झाले होते. कपाळ चांगलंच तापलं होतं. बऱ्याच वेळानें ती शांत झाली. तिचे हुंदके तिच्या आटोक्यांत आले. " मी जाणार हें हॉस्टेल सोडून—हो, उद्यांच जाणार—किती बोलली आशा आज—" तिचा गळा दाटला. " श्रीमंती हा दोष आहे कां ग माझा ? "

काय बोलावं हेंच मला कळेना. श्रीमंती हा दोष ? साऱ्या दोषावर पांघरूण घालणारी श्रीमंती ! किती विचित्र होता प्रश्न ? "कशाला देवानं आम्हांला श्रीमंत केलं कुणास ठाऊक—गरीब असतो तर—" पुढचे शब्द हुंदक्यांत विरून गेले. मी सरोजकडे पहात होते. आश्चर्याचा चांगलाच धक्का बसला होता मला. श्रीमंत करण्याबद्दल देवाला रात्रन्दिवस आळवणारं सारं जग आणि श्रीमंत केल्याबद्दल देवाला दोष देणारी सरोज—छे ! केवढा हा विरोध. किती विचित्र ?

बरीच समजूत केल्यावर सरोज जरा शांत झाली. मी माझ्या खोलींत आले. पण अजूनहि सरोजचे शब्द कानांत घुमत होते. खरंच, सरोज गरीब असती तर सुखी झाली असती का ?—फार तर हॉस्टेलच्या छोट्या जगांत तिचा छळ नसता झाला—पण बाहेरच्या अफाट जगांत...दहाचे ठोके पडले. आतां डोक्यांतले विचार काढून टाकणं भागच होतं. दुसरेच दिवशीं कॉलेजांत इतिहासाची वही द्यायची होती. आणि अजून एकहि प्रश्न लिहून नव्हता झाला. मी टेबलाजवळ गेले; इतक्यांत माझ्या लक्षांत आलं—माझी

इतिहासाची वही प्रमिलेनं नेली होती. मी प्रमिलेच्या खोलीकडे वळले. बराच वेळ दाराची कडी वाजवल्यावर प्रमिलेनं दार उघडलं. खोलींत अंधार होता.

"वा ! इतक्यांत झोपलीससुद्धा. सारे प्रश्न लिहून झाले वाटतं बाई-साहेबांचे—" बोलत बोलतच मीं दिव्याचं बटन दाबलं. खोलींत प्रकाश पडला. पण काय दिसलं मला त्या प्रकाशांत ? रडून रडून लाल झालेले प्रमिलेचे डोळे अन् नाक ! मी थक्कच झाले.

"हें काय ? रडत होतीस प्रमिला तूं ?"

दोन्ही हातात तिनं तोंड लपवलं. मोठया कष्टानें इतका वेळ दाबून धरलेला हुंदका जोरानें बाहेर पडला. अगदीं ओक्साबोक्सी ती रडत होती. तिची समजूत कशी, कोणत्या शब्दानें घालावी हेंच मला कळेना. गेले चार महिने मी तिला पहात होते. तिला रडतानांच काय, पण दुर्मुखलेली देखील मी कधीं नव्हतीं पांहिली. नेहमीं हंसतमुख. आमच्या वॉर्डननी तिचं नांवच ठेवलं होतं—' हंसरी प्रमिला ' आणि तीच हंसरी प्रमिला आज रडत होती. तिच्या रडण्याचं कारण मला कळत नव्हतं—ती रडतच होती. रडता रडताच ती क्षणमात्र थांबली. ओठ घट्ट दाबून आलेला हुंदका दाबला. "गरिबी हा दोष आहे काग ?" एकच वाक्य पण केवढं धक्का देणारं ! मला कळेना. आज हें आहे तरी काय ? पंधराच मिनिटांपूर्वीचा तो सरोजचा प्रश्न आणि आतां हा प्रश्न. प्रमिला आवेगानें बोलत होती.

"हो. आम्ही कुठं नाहीं म्हणतों—आम्हीं आहोंतच गरीब. पुन्हां जोराचा हुंदका आला. तिचं वाक्य अर्धच राहीलं. "पण झालं काय तें तरी सांग ?" मी विचारलं.

"आज विमल जेवतांना किती टाकून बोलली मला—" क्षणभर ती गप्प राहिली. विमल म्हणाली "एकच लुगडं हजारदां नेसायला लाज कशी नाहीं वाटत—पैसे नसतील तर यावं कशाला दरिद्र्याच्या मुलीनीं इथं... घरीं बसावं भाकऱ्या भाजीत—आणि आशा म्हणाली—"

पण मी प्रमिलेला पुढं बोलूंच दिलं नाहीं. हें सारं सांगतांना तिच्या मनाला होणाऱ्या वेदना मला स्पष्ट दिसत होत्या. विषारी शब्दांनीं मन घायाळ करण्यांत विमलपेक्षां आशेचा नंबर खूपच वर लागत होता. हें पण मी जाणत होते.

" जाऊंदे ना प्रमिल्, मूर्ख आहेत त्या अगदीं. लक्षच नये देऊं आपण तिकडे—" मी तिची समजूत घालीत होते.

" गरिबी हा दोष आहे का ग आमचा ?—आम्ही श्रीमंत असतो तर–"

" तरी देखील रडणं नशीबाचं चुकलं नसतं." अगदीं ओठापर्यंत आलेले शब्द मी परतवले. पलिकडच्या खोलींतली सरोज–श्रीमंती तिला रडवीत होती. भिंतीपलिकडचे तिचे हुंदके प्रमिलेला ऐकूं येत नव्हते. आणि सरोजला प्रमिलेचं दु:ख कळत नव्हतं. दोन दु:खी जीव–माझं डोकं बधीर झालं. असाह्यतेनं मी समोर पहात होते. सरोज आणि प्रमिला–दोघींच्या मधली भिंत–ती एकच भिंत ! ती...ती मधली भिंत कोसळून पडली तर—पाडली तर ?—

---

# लग्नाची बायको

' कांहीं म्हण विनू, पण इतक्यांत लग्न करून संसाराची जबाबदारी डोक्यावर घ्यावी असं मला वाटत नाहीं.'

' मग काय—शेवटपर्यंत असाच अखंड ब्रह्मचारी रहाणार आहेस ?'

' छेरे ! तसंही नाहीं. मी लग्न करीन. पण...'

' अजूनही तुझा हा ' पण ' आहेच का ? शिक्षण संपलं. चांगली नोकरी लागली. आम्हांला लग्न करावंसं वाटलं तर ही परिस्थिति आड येते. आणि तूं ? अगदीं मूर्ख आहेस बघा तूं ! अरे लेका, मंजुसारखं रत्न मिळायला भाग्य पाहिजे भाग्य—समजलास ? चांगली इंटरपर्यंत शिकलेली सुशिक्षित, सुंदर, सद्गुणी, मूर्तिमंत लक्ष्मी आहे.'

'म्हणूनच तर नकोय मला ती. तिला एकादा विष्णुच पाहिजे बरं बाबा–माझ्यासारख्याचं नव्हे काम तें. राजानं हत्ती दिला तरी तो पोसायला...'

'शटअप्. अगदींच होपलेस आहेस वश्या तूं. असलं रत्न हातचं सोडून एकादी गारगोटी—'

'एकदम बरोबर. मला पाहिजे गारगोटीच. कोंदणांत चमकणारं रत्न क्षणभर पहाणाराचे डोळे दिपवीलही–पण झटक्यासरशीं अग्नि निर्माण करणारी गारगोटीच मला खास आवडेल. हो, निदान आगपेट्यांचा खर्च तरी वांचेल.' माझी खात्री होती. माझ्या ह्या अशा बोलण्यानं विनूच्या रागाचा पारा अजून जरा वर चढणार. तो चिडून कांहींतरी बोलणार. मी त्याच्याकडे हंसत हंसत पहात होती. पण तो कांहींच बोलला नाहीं. समोरच्या खिडकींतून तो बाहेर पहात होता. एकाएकीं त्याचा चेहरा पालटेला. तोंडावर स्मित झळकूं लागलं. डोळ्यांत चमकही कांहीं निराळीच—

—तो पहात होता त्या रोखानं मीहि पाहूं लागलों. एकदम माझं लक्ष गेलं तें समोरच्या फाटकावर वसलेल्या एका काळ्या मांजरावर. झाडावरच्या कावळ्याच्या चोंचींतल्या पावाच्या तुकड्याकडे आशाळभूतपणें पहात होतं तें. छट्! अगदींच साधी गोष्ट.

—मी पुन्हां विनूकडे पाहिलं. तीच आशाळभूत नजर, तेंच स्मित. मी पुन्हां बाहेर शोधूं लागलों. समोरचं तें पिवळ्या चाफ्याच्या फुलानं बहरलेलं झाड–अंह. विनू म्हणजे एक साधा अविवाहित कारकून! फुलाकडं पहातांच अशा आनंदाच्या गुदगुदल्या व्हायला तो कवि थोडाच होता! मग–इतक्यांत माझी नजर शेवग्याच्या शेंगानं लवलेल्या झाडाकडे गेली. माझं मलाच हंसू आलं, छे! विनू इतका कांहीं आधाशी नाहीं.

शेवटीं जरा त्रासिक स्वरांतच विचारलें मी—

'एवढा पहातोस कुठं टक लावून? त्या काळ्या मांजराकडं, कीं त्या झाडावरच्या कावळ्याकडं, कां त्याच्या तोंडांतल्या पावाच्या तुकड्या–'

'काय अरसिक आहेस रे. जरा समोर बघ कीं लेका' मी पुन्हां बाहेर पाहूं लागलों.

'अरे ह्या समोरच्या खिडकींत'–मी तिकडे नजर टाकली मात्र आणि लगेच मोठमोठ्यानेंच हसूं लागलो. 'अस्सं. तरीच एवढ्या अधाशीपणानं पहात होतास तो' विनू जरा ओशाळला आणि त्याचा तो ओशाळलेला चेहरा पाहून मला जास्तच हसूं येऊं लागलं.

नंतर थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा मारून विनू जाण्या-साठीं निघाला,

'बैस रे थोडा वेळ–आतां कुठें साडेसहा–'

'मला जरा काम आहे. जातोच आता.' मी ओळखलं. विनूला कांहीं एक काम नाहीं. अजून एक दीड तास तो सहज थांबला असता. पण समोरच्या खिडकींतला तो देखावा आणि त्यामुळें चलबिचल होणारं विनूचं मन, मला पुन्हां हसूं आलं. 'वाटल्यास ती खिडकी बंद करून घेतो.' आणि मी उठलों देखील. विनू ज्यास्तच ओशाळला. 'आचरटासारखं बोलूं नकोस–लहान कां आहेस आतां–मूर्खा' आणि कांहींतरी अर्थरहीत बडबड करीत विनू निघून गेला.

आरशांत पाहून भांग सरळ करतांकरतांच माझी नजर सहजच समो-रच्या खिडकींत गेलीं. मघाचं जोडपं अजूनही गप्पांत रंगलं होतं. टेबलाला टेकून ती अजूनही तेव्हां प्रमाणेंच उभी होती. चहाचा कप त्याच्या पुढें अजूनहि तसाच होता. विनूची ती आशाळभूत नजर आठवली. मी स्वत:शींच हसलों.

पण कां कोणास ठाऊक! त्या दिवसापासून माझी नजर वरचेवर त्या खिडकीकडे वळूं लागली. पूर्वी कधीं कधीं माझी नजर त्या घराकडे वळे–पण अगदीं सहज. आतांच तस्साच, अगदीं सहजच पहात होतों मी तिकडे, पण—पण दिवसेन् दिवस माझं मन त्या खिडकीकडे ज्यास्त वेधलं जाऊं लागलं हें खास.

तसंच पाहिलं तर इतकं मन वेधून घेण्यासारखं कांहींच नव्हते त्या घरांत. घर सुंदर तऱ्हेनें--अगदीं आधुनिक पद्धतीनें सजविलं होतं. पण त्याहूनही सुंदर तऱ्हेनं सजवलेली कितीतरी घरं मी पाहिलीं होतीं. माझं स्वतःचं घर चिमुकलंच कां होईना--कांहीं कमी सुशोभित नव्हतं. बरं, घरांतल्या माणसापैकीं कोणाकडे मन वेधलं जावं म्हणावं तसाही कांहीं प्रकार नव्हता. घरांत मोजून माणसं दोन तीन जीव.

तो, ती आणि सुंदर, घराला शोभणारं कुत्रं. संपलं !

तो तर काय पुरुष अर्थात् त्याचा प्रश्नच नव्हता. आणि ती? त्याला शोभणारीच होती. दिसायला सुंदर, तरतरीत, हंसतमुखी--पण एक विवाहीत स्त्री ! मन वेधून घेण्यासारखं बरंच असूनही माझं मन ती खास वेधून घेत नव्हती. मग--आतां राहता राहिलं तें कुत्रं. मी एकदम कबूल करतो कीं, कुत्र्याचं आणि माझं विळ्याभोपळ्या एवढं सख्य. किती तरी सुंदर, छान छान कुत्रीं पाहिलीं असतील मी, पण एकाच्या आंगावरून हात फिरवला तर शपथ. कुत्र्यापासून नेहमीं चार हात दूरच रहात असें मी.

आणि कोणतीही एक विशिष्ट गोष्ट माझं मन वेधून घेत नसूनही मी त्या घराकडे वरचेवर पहात होतो.

मी रोज सकाळीं अकरा वाजतां ऑफिसांत जाऊन संध्याकाळीं साडेसहाला परत येई. पुढच्या घरांतला तो तरुण रोज माझ्यापेक्षां अर्धा तास लवकर जाऊन संध्याकाळीं अर्धा तास उशिरा येई.

संध्याकाळीं त्याच्या मोटारीचा हॉर्न वाजतांच कुठं असेल तेथून तो कुत्रा तिरासारखा धांवत येई. आणि मुद्दामच तोही मोटारींतून खालीं उतरतां उतरतां हॉर्न वाजवी. त्यांचं पाऊल दारांत पडतं न पडतं तोंच त्या कुत्र्याची उडी त्याच्या आंगावर पडे. हातांतले ' इव्हिनिंग न्यूज ' टेबलावर टाकून तो त्या कुत्र्याला हंसत हंसत उचलून त्याचे पटापट मुके घेई. त्याच्या कपाळावर आपलं कपाळ घासे. त्याचे केस पिंजारी--आणि येवढ्या अवधींत हॉलच्या दारांत येऊन राहिलेली ती त्याची हंसरी गृहलक्ष्मी. मग दोघांचा मिळून

चहा–फराळ होई. मधून मधून त्या कुत्र्यालाही–हो त्याचें नांव शॉगी-त्यांतला थोडा भाग मिळे. अन् शेवटीं थोडा चहा मुद्दाम मागें ठेऊन स्वतःच्याच बशींतून तो त्या शॉगीला देई. नंतर ती दोघं अर्थात् शॉगी असणारच बरोबर—फिरायला जात. रात्रीं पुन्हां दोन तास गप्पा. आणि अकराच्या ठोक्याबरोबर त्या घरांत अंधार होई.

सकाळींही हा असाच कार्यक्रम. त्याची ती हसरी गृहलक्ष्मी त्याला निरोप द्यायला दारापर्यंत आली नाहीं असा दिवस माझ्यातरी स्मरणांत नाहीं. शॉगी तर मोटारीचं दार उघडतांच आंत जाऊन बसे. मग कितीतरी वेळ तो त्याला कुरवाळी–मुके घेई. समजुतीच्या गोष्टी सांगे. अन् मग कुठें शॉगीची स्वारी डुलत डुलत मोटारींतून खालीं उतरे. मोटार सुरू करतां करतां तो तिच्याकडे पाही. हंसतहंसत मान हालवून दोघंही एकमेकांना निरोप देत. मोटार दिसेनाशी होईपर्यंत शॉगी आणि त्याची मालकीण दारांत उभी असत. आणि नंतर दरवाजा लावला जाई.

पूर्वी सहजच–अगदीं निर्विकार मनानें मी हें सारं पहात होतों. पण आतां? मन निर्विकार ठेवणं कठीण जावूं लागलं. हळूंहळूं त्या घराकडे, त्याच्या हालचालींकडे पहाण्याचं मला व्यसनच जडलं. ऑफिसांत काम करून थकून घरीं येतांच समोरच्या खिडकींकडे नजर वळावी. नकळत मन उल्हासीत होई. पण कधींकधीं त्या दोघांना एकत्र पहातांच कुठेंतरी, कांहींतरी टोचल्याचा भास होई. माझ्या एकटेपणाची तीव्र उणीव होई •

खरंच, मंजूळेला नकार देण्यांत वेडेपणा तर नाहीं ना झाला? वेडेपणाच नाहीं तर काय? मंजू सारखी सुंदर, सुशिक्षित पत्नी; तिच्याबरोबर घरीं चालत आलेली संपत्ति ही अशीच समोरच्या सारखी! आपणही एक छोटीशी मोटार घेतली असती. आपणही रोज असेंच फिरायला—

माझा मीच चमके. विनूच्या आशाळभूत नजरेची आठवण होई. केवढा हंसलो त्याला मी त्यावेळीं! आणि आतां मीं स्वत:?—माझी मलाच लाज वाटे. समोरच्या खिडकीवरून मी नजर काढून घेई.

अडगळींत इतर सांगून आलेल्या मुलींच्या फोटो बरोबर मंजूचा फोटो पडला होता. आतां तो तेथून टेबलाच्या खणांत आला. अजूनही वेळ गेली नव्हती. द्यावा का रुकार मंजूच्या वडलांना ? क्षणांत आपलं रुक्ष घर नंदन-वन होईल. समोरचा संसार अगदीं तस्साच आपला संसार थाटला जाईल. पण–पण हा सोनेरी मुलामा तर नसेल ? पुन्हा माझी नजर समोरच्या खिड-कीवर रोखली जाई. एकमेकाच्या डोळ्यांत आपापली प्रतिमा पहात–गालांतल्या गालांत हंसत, मूक संभाषण करणारं तें जोडपं. छे ! खराखुरा आदर्श संसार ! !

माझं आगदीं ठाम मत झालं होतं–जगांत दिसणारे सुखी संसार म्हणजे नुसती वरवरची शोभा–नाटक, दिसायला सुखी जीवन पण आंत सारी तळमळ. दाबून टाकलेल्या दुःखाचे, निराशेचे उसासे. पुरुषापासून भलत्याच अपेक्षा करणारं वेड ! स्त्री हृदय ! नवरा सर्वस्वी आपला–फक्त अ.पला असावा. त्य चं सर्वस्व म्हणजे आपणच–वेड्या मनाची भलतीच महत्त्वाकांक्षा, वाऱ्यावरचं मनोराज्य—

आणि आकाशांत भरारी मारणारं पुरुष हृदय ! कसा बसावा दोहोंचा परस्पर मेळ ? एकाच स्त्रिचं प्रेमसर्वस्व होऊन रहाणं अशक्य नाहीं. खरं आहे. पण माझ्यासारख्या चंचल वृत्तीच्या माणसाला एकाच स्त्रीचं प्रेम–एकच सहवास पुरेसा वाटेल कां ?–लग्नांत घेतलेली एकनिष्ठतेची शपथ पाळतां येईल कां ? माझी मलाच शंका वाटे. मग काय ?—इतरांप्रमाणें लग्न करायचं–एकनिष्ठतेचें नाटक सुरू ठेवून. वेड्या, स्त्री हृदयाला अन् त्या बरोबर स्वतःच्याही मनाला फसवीत शेवटपर्यंत नाटक पार पाडायचं ? पण तेंही माझ्या मनाला पटत नसे.

लपंडाव नाहीं. नाटक नाहीं. अगदीं सरळ, सरळ त्या दोघांचं आयुष्य पहातां पहातां माझं अस्थीर मन स्थीर होऊं लागलं. स्थीर झालेल्या मनाची खात्री मला पटली.

मी मनाशीं निश्चय केला–दोन महिने कांहीं कामासाठीं धारवाडला

जाणं भाग होतं. तेथून परत येतांच लग्न उरकून घ्यायचं. आदर्श–अगदीं समोरच्याप्रमाणे आदर्श संसार थाटायचा.

त्या रात्रीं घारवाडला निघण्यापूर्वीं मी त्या खिडकीकडे पहात उभा होतो. ती दोघं–एकमेकाच्या शरीरावर रेलून खिडकींतून चंद्राकडे पहात होती. अजून थोडयाच दिवसांनीं आपणहि असेच–मी स्वत:शींच हंसलों.

जवळ जवळ अडीच महिन्यांनीं मी परतलो. दाराचं कुलूप काढतां-काढतांच मी वळून त्या खिडकीकडे पाहिलं. खिडकी लावलेली होती. दारही लावलेलं. ते लोक जागा सोडून तर गेले नाहींत ?–माझं मन अस्वस्थ झाल. मी स्वत:ची समजूत घालूं लागलों–हं गेले तर गेले. त्यांची आपली ना ओळख ना पाळख. ते गेले तर दुसरं कोणी येईल रहायला. जागा थोडीच मोकळी पडणार आहे ?–आणि पडली तर पडली. आपलं थोडंच होणार आहे नुकसान–पण राहून राहून मला चुकल्या चुकल्या सारखं वाटूं लागलं. मन बेचैन झालं. मधून मधून माझी नजर सारखी समोर जाई. आणि शेवटीं खिडकी उघडली गेली. भीत भीत मी आंत नजर टाकली. घरांतलं सारं सामान पहातांच मी सुटकेचा निश्वास टाकला. माझं मन नकळत आनंदित झालं.

पहिले दोन चार दिवस माझ्या लक्षांत कांहींच नाहीं आलं. पण हळुहळू समोरच्या घरांत, त्या दोघांतच नव्हे तर शागीतही पडलेला फरक मला जाणवूं लागला. माझं मन पुन्हां अस्वस्थ झालं.

मालक घरांत येतांच त्याच्या अंगावर झडप घेणारी शागी मालक घरांत येतांच बाहेर येऊन दारांत बसे. कुरवाळत नाहीं. झडप घेत नाहीं–कांहीं नाहीं. शागी आजारी तर नाहीं ? मला शंका आली. पण छे ! ती हंसरी गृहलक्ष्मी पण कशी अगदीं कोमेजून गेली होती. अगदीं क्वचितच ती दिसे. पूर्वीसारखं फिरायला जात नाहीं–गप्पा नाहींत–का आपल्याच संशयी मनाचा हा सारा खेळ ? मी माझ्या मनाची समजूत घालण्याचा

प्रयत्न लागलो. पण तें सोपं का काम होतं? मला पूर्णपणें कळून चुकलं. नक्कीच कांहींतरी बिघडत आहे !

धारवाडवरून येऊन पंधराच दिवस झाले होते. एका रात्रीची गोष्ट. जरा डोळा लागत होता मला. तोंच कुत्र्याच्या प्राणान्तिक ओरडण्यानं मी जागा झालों. मनांत एक शंका आली. मी झटकन् खिडकींत गेलो. माझी शंका खरी ठरली. दारांतच शागीला त्याचा मालक काठीनें बडवीत होता. मालकाच्या पायाजवळ शागी लोळत होता. प्राणान्तिक वेदनानीं किंकाळत होता. त्याचं मारणं चालूच होतं. शागी मरणार–त्याचा मालक त्याचा जीव घेणार—

कोणास ठाऊक कोठून आणि कसं मला धैर्य झालं तें. खोलीचें दार उघडून धांवतच मी बाहेर पडलों.

"थांबा–थांबा" शागीच्या मालकानें तारवटलेल्या नजरेनें एकदां माझ्याकडे पाहिलं. आणि पुन्हां काठी वर उचलली.

"तुमची हरकत नसेल तर मी घेऊन जातो त्या कुत्र्याला." मी भीतभीतच बोललो.

"चला–उचला–उचला लवकर. पुन्हा जर मला हा दिसला तर मुडदा पाडीन. सारखा पायांत–पायांत–डर्टी–स्वाइन"–त्यानें पुन्हा काठी वर उचलली. मी झटकन् पुढें होऊन शागीला उचलून घेतलं. डोळे पुसीत आंतल्या खोलींत जाणारी शागीची मालकीण माझ्या नजरेंतून नाहीं निसटली. शागीला घेऊन मी घरांत आलों. अर्धमेला झालेला शागी कितीतरी वेळ अगदीं निचेष्ट पडला होता. त्या दुर्दैवी मूकजनावराकडे पाहतांपाहतांच तीन महिन्यापूर्वीचे दिवस आठवले.

हाच शागी. शागीला कुरवाळणारा, त्याला स्वतःच्या बशींतून चहा पाजणारा आणि मोटारींतून मांडीवर बसवून फिरायला घेऊन जाणारा मालकही तोच! त्याचं कुत्र्यावरचं प्रेम पाहून त्यावेळीं मला आश्चर्य वाटे. पण आता?—

शागी माझ्याजवळ राहिला. कुत्र्याबद्दल वाटणारी भीति आतां पार नाहींशी झाली होती. लवकरच शागी माझ्या अंगाखांद्यावर खेळूं लागला. पण मधूनच तो कावराबावरा होई. केविलवाण्या नजरेनं माझ्याकडे पाही. अंगावरून प्रेमानं फिरणारा हात जीव घ्यायला कसा सरसावतो—याचा त्या मुक्या प्राण्याला आलेला अनुभव ! मी चटकन् त्याच्या तोंडावरून हात फिरवी. शेपटी हालवून आणि माझे पाय चाटून तोही आपल्या मनांतला भाव व्यक्त करी.

मालक नसतांना तो कधीं कधीं मालकिणीला भेटून येई. माझ्याबरोबर खिडकींतून समोरच्या घराकडे पहात तासनूतास बसून राही. अलिकडे दारंखिडक्या बहुतेक बंदच असत.

क्वचितच माणसाचा चेहरा दृष्टीस पडे. मध्यरात्रीं कधींकधीं मोटारीचा आवाज ऐकू येई. घराचा मालक घरीं परतल्याचं समजे.

विचार करूनही मला उलगडा होत नसे. आदर्श संसार-आदर्श प्रेम-आणि एवढ्या अवधींत झालेला हा असला शेवट ! शेवटीं सोनेरी मुलामाच उरला. माझी परीक्षा खरी ठरली. पण मी केलेला अंदाज खोटा ठरला असता तर ?-केवढा आनंद-पण तें कसं शक्य होतं ?

त्या रात्रीं मी शांत झोपलों होतो. पण एकाएकीं शागी मोठमोठ्यानें भुंकू लागला. मी दचकून जागा झालों. खोलीचं दार शागी नख्यानं ओरबडत होता आणि मोठमोठ्यानें भुंकत होता. मला कांहींच कळेना. उठून दार उघडतांच शागी तीरासारखा बाहेर धावला. मी बाहेर पाहूं लागलों तोंच समोरच्या घरांतून किंकाळी ? माझ्या सर्वांगांतून चमक निघाली. डोळे फाडून मी समोर पाहू लागलों

अगदीं तोच प्रकार. शागीचा मालक काठीनें बडवीत होता. कुणाला ?-त्याच्या लाडक्या प्रिय पत्नीला !

शागी मालकाच्या दरवाज्यावर जोरजोरानें डोकं आपटीत होता. मोठमोठ्यानं भुंकत होता. माझ्या शेजारची मंडळीही बाहेर आली होती.

सर्व कसे चित्राप्रमाणे स्तब्ध उभे होते. तो जरा शुद्धिवर आला. त्याचं मारणं जरा आटोक्यांत आलं. तोंडानें शिव्यांचा मारा मात्र दुपटीनें वाढला.

माझ्या शेजारचा एक गृहस्थ दुसऱ्या एका माणसाला हलक्या आवाजांत सांगत होता—" त्या अँग्लोइंडियन पोरीनं नुसतं वेड लावलंय—तिच्यापुढं घरदार कांहीं नाहीं, त्यांतून पिण्याचं व्यसन—" मला रहावलं नाहीं. मध्येंच विचारलं—

" पण हें सारं अलिकडे लागलेलं दिसतंय. पूर्वी कसा चांगला—"

" अहो कसलं आलंय. सारं ढोंग. पूर्वीपासून आहे हें पण सासरा जिवंत होता ना—त्याची सारी इस्टेट ह्यालाच मिळणार होती. दोन महिन्या पूर्वीच सासरा वारला " आणि—पुन्हां किंकाळी ऐकू आली. जोरजोरानें तो तिच्या तोंडांत मारीत होता.

मी आवेशानें पाऊल उचललं.

" कुठं चाललांत "—शेजारच्या माणसानं माझी बाही धरून विचारलं.

" तिला सोडवलंच पाहिजे, ह्या जंगली जनावराच्या हातून. " माझा आवाज घोगरा येत होता.

" वेड तर नाहीं लागलं तुम्हांला ?—अहो दारू प्यालेला माणूस तो. ना शुद्ध. तुमचंच डोकं फोडेल. "

" हरकत नाहीं फोडलं तर. पण अशा वेळीं स्वस्थ राहून पहायचं ? त्याच्या कुत्र्याला देखील मी त्याच्या तावडींतून सोडवलं—वाचवलं—"

पुन्हां त्यानें मला मागें ओढलं—" विसरतां तुम्हीं. कुत्र्याची गोष्ट वेगळी आहे. ही त्याची लग्नाची बायको. नवरा—बायकोच्या खाजगी गोष्टींत पडण्याचा अधिकार काय !—म्हणून विचारलं त्यानं तर ?—अहो, लग्नाची बायको—" माझ्या हातापायांतली सारी शक्ति नष्ट झाली. माझ्या कानांत शब्द घुमू लागले—कुत्र्याची गोष्ट वेगळी—ही लग्नाची बायको—लग्नाची बायको !

---

# केशाकर्षण !

तिच्या त्या लांबसडक वेणीकडे पहात रहाण्यास त्याला चुकूनहि कंटाळा येत नसे—त्यातच त्याचा आनंद समवलेला होता. कित्येकदां स्वतःच्या हातानें तो तिची वेणी सोडी—आणि मग तिच्या त्या मऊ, सुंदर, कुरळ्या केसावरून हात फिरविण्यांत तासन् तास निघून जात... त्याचे केस कुरवाळीत म्हणे—" किती सुरेख आहेत, निर्मल तुझे केस ! "

" खरंच ? "—निर्मलेच्या डोळ्यांतला तो आनंद, अभिमान...

बोलतां बोलतां ती त्याचे हात आपल्या हातांत घेई. पण फारच थोडा वेळ टिकत त्याचे हात तिच्या हातांत...हळूंच तो आपले हात सोडवून घेई. आणि मग पुन्हां तिचे केस कुरवाळण्यास सुरुवात होई.

ती एकदां सहज थट्टेनं म्हणाली होती--"जर मी खूप आजारी पडलें आणि माझे केस गेले तर--"

किती संतापला यावर रत्नाकर! कोठून असं बोलण्याची बुद्धि सुचली असं झालं निर्मलेला.

रत्नाकराचं तिच्या केसावरचं प्रेम ती जाणत होती. स्वतःच्या जीवापलिकडे ती स्वतःच्या केसाची काळजी घेई. तिला स्वतःच्या सुंदर केसाबद्दल अभिमान वाटे—पण–पण एकादेवेळीं तिला भिती पण वाटे—तिच्या मनांत विचार येई—"न जाणो आपल्या केसाचं सौंदर्य नष्ट झालं तर...तर किती वाईट वाटेल रत्नाकरांना, किती धक्का बसेल त्यांना—" पण तितक्याच झटक्यानें ती हा विचार डोक्यांतून काढून टाकी.

—दिवसामागें दिवस जात होते–केसांची अत्यंत काळजी घेतली जात असल्यानें, मुळचेच लांबसडक केस खूपच वाढले होते—ते आतां ज्यास्तच मऊ नि सुंदर दिसत. पण इतकं सारं असूनहि ज्याच्यासाठीं केसाची इतकी काळजी घेतली जात होती त्याचंच आतां त्या सुंदर केसाकडे दुर्लक्ष होत होतं–क्वचित्, अगदीं क्वचित् स्पर्श होई त्या केसांना! आतां रत्नकराचा–निर्मलेच्या नजरेंतून कसा सुटावा हा फरक–तिला कळेना–असं कां?

आणि एक दिवस तिला कळून चुकलं–रत्नाकराला आतां दुसऱ्याच मुलीचं वेड लागलं होतं–विश्वासहि बसेना निर्मलेचा त्या गोष्टीवर–शेवटीं वेड्या आशेनें तिनें विचारलंच रत्नाकराला...तिची खात्री पडली...रत्नाकर आतां तिचा नव्हता!

तिला कळत होतं–दुःख करून आतां कांहीं उपयोग नाहीं—स्वतःच्या वेड्या मनाची समजुत घालण्याचा ती प्रयत्न करी–पण–पण तिचे ते सुन्दर कुरळे केस! तिला रत्नाकरच्या शेवटच्या उद्गाराची आठवण होई—"तुझ्या केसावर प्रेम करून माझ्या प्रेमाची भूक भागणार नाहीं—मला नुसतें केसाचें सौंदर्य नको—" आणि मग मात्र तिला दुःख असह्य होई!

हरघडीला गतकालची आठवण करून देणाऱ्या त्या केसांचा तिला

राग येऊं लागला–रागाचें रूपांतर द्वेषांत झालं–तिनें स्वतःच्या केसांवरच सूड उगविण्याचें ठरविलें–तिनें केसाची अत्यंत हेळसांड चालविली आठ आठ दिवस तिच्या केसाला फणी लागेना–पण तिचा विपुल केशभार थोडाही कमी झाला नाहीं—

—दुःख विसरण्याचा तिनें शेवटचा प्रयत्न करून पहाण्याचं ठरवलं–सुखदुःखाची ओळख करून देणाऱ्या त्या केसांचाच शेवट लावला तर—?

विचार आचारांत उतरला. केवळ स्त्रियांच्यासाठींच असलेल्या त्या दुकानांत ती चढली...केस कापणारी ती ॲंग्लोइंडियन बाई हरतऱ्हेनें तिचं मन वळविण्याचा प्रयत्न करीत होती–निर्मलेचे केस किती सुन्दर आहेत ह्याची जाणीव निर्मलेला व्हावी म्हणून तिचा चाललेला प्रयत्न...आज किती तरी वर्षें ती बाई हा धंदा करीत होती. पण केस न कापण्याचा उपदेश तिच्या आयुष्यांत आजच ती प्रथम करीत होती—निर्मलेच्या सुंदर केसांपुढें तिला स्वतःच्या धंद्याचेंहि विस्मरण पडलें होतें.. तिची विनवणी चालूच होती–निर्मलेच्या कपाळावर आठ्यांचें जाळें पसरलें होतें. ती त्या बाईवर खसकन् ओरडली—

"तुम्हीं तुमचं काम करा—उगीच शहाणपणा—" ती थांबली. तिचं लक्ष दुकानांत आपल्या छोट्या बहिणीला हातांत धरून चढणाऱ्या त्या सुंदर मुलीच्या डोळ्याकडे गेलें–ती मुलगी सुंदर होती–पण तिचे डोळे–इतके सुंदर डोळे निर्मल प्रथमच पहात होती...

—जड हातानें ती बाई निर्मलेची वेणी सोडीत होती, वेणी संपूर्ण सोडली गेली–निर्मलेची पाठ केसानें झांकली गेली. त्या मऊ केसांवरून हात फिरविण्याचा मोह त्या बाईलाही आवरला नाहीं–दोन तिनदां तिनें त्या सुंदर केसांवरून हात फिरविला–तिचें समाधान झालें नाहीं–ती खालीं वाकली आणि निर्मलेच्या केसांवर ओठ ठेवले.

निर्मलेच्या शरीरावर कांटा उभा राहिला. अंगांतून वीज चमकल्याचा तिला भास झाला—

--रत्नाकरहि अशाच अगदीं असाच करीत असे–क्षणभरच तिनें हातांत तोंड लपवलं--

—त्या बाईनें कात्री उचलली--

"हें काय? तुम्ही केस कापणार?" इतका वेळ निर्मलेच्या केसाकडे अनिमिष नजरेनें पहाणाऱ्या त्या सुंदर मुलीनं दचकून विचारलं.

निर्मलेनें उत्तर दिलं नाहीं. प्रत्यक्ष दिसत असतां अशा प्रश्न विचारणें तिच्या दृष्टीनें मूर्खपणाचंहि असेल!

"असे सुरेख केस कापून काय मिळविणार तुम्ही?"

प्रश्नाला उत्तर मिळालेलं नसतांनाहि न रहावल्यामुळें ती अनोळखी मुलगी पुन्हा तिच्याशीं बोलण्याचा निर्लज्जपणा करीत होती.

"तुम्हांला नाहीं कळायचं तें" किती तुसडेपणा होता निर्मलेच्या उत्तरांत! "हं चला लवकर आटपा" हातांत कात्री घेऊन उभ्या असलेल्या त्या बाईला निर्मलेनें आज्ञा दिली.

"एक विनंती करूं का?" ती मुलगी भीत भीत बोलली. "हें पहा कितीहि उपदेश केलात, विनंती केलीत तरी त्याचा कांहीं उपयोग नाहीं. उगीच त्रास नका— " निर्मलेच्या स्वरांतला चिडकेपणा कायम होता.

"तसं नव्हे पण–"

क्षणभरच थांवली ती मुलगी—तुमचे केस द्याल मला?" तिचा स्वर अजिबी होता.

"हाताच्या एवढंच ना? घ्या कीं. मला काय करायचे आहेत ते–" हंसत निर्मल बोलत होती.

त्या मुलीच्या बोलण्याचा तरी कांहीं निर्मलेवर परिणाम होईल या आशेनें उभ्या असलेल्या त्या बाईची निराशा झाली–तिनें आपल्या कामास सुरुवात केली–ती मुलगी केव्हांच खोलीच्या बाहेर गेली होती!

कात्रीचा आवाज होत होता. निर्मलेनें आपले डोळे घट्ट मिटून घेतले— इतका वेळ टिकवलेली मनाची शांतता नष्ट होऊ न देण्याचा चाललेला तिचा तो प्रयत्न...

मानेपर्यंत केसांची मर्यादा आली--त्या बाईनें तिला उठण्याची परवानगी दिली. तिनें डोळे उघडले. नकळत समोरच्या आरशांत तिचं लक्ष गेलं--मानेपर्यंत लोळणारे ते केस-तिनें चटकन् नजर फिरवली पैसे देतांना. तिनें सहज त्या बाईकडे पाहिलं-केस कापण्यांत तरबेज असलेल्या त्या बाईचे डोळे भरून आले होते.

—स्वत:चे डोळे दगा देतील ह्या भीतीनें निर्मला गडबडीनें जाण्यास निघाली. ती दारापर्यंत आली होती—

"बाईसाहेब, तुमचे केस—" तिचे केस व्यवस्थित गुंडाळून तिला देण्यासाठीं ती बाई तिच्याकडे येत होती.

"ते त्या बाईना द्या." त्या केसाकडे न पहातांच निर्मलेनें त्या मुलीकडे बोट दाखवले.

× × ×

निर्मलेच्या आजुबाजूचे सर्व लोक तिला नांवं ठेवीत होते—सर्वांच्या निंदेचा ती एक विषय झाली! प्रत्यक्ष तिच्या आईनं तिच्याशीं अबोला धरला—एके काळीं तिच्यावर प्रेम करणारीं तिचींच माणसं तिला वाटेल तसं बोलूं लागलीं. सर्वांच्या बोलण्यांतून एकच सूर निघत होता... केवळ फॅशन म्हणून निर्मलेनें स्वत:चे सुरेख केंस कापले! तिनें मूर्खपणा केला!!

शांतपणें निर्मला साऱ्यांचं ऐकून घेत होती. जगाला खऱ्या गोष्टीची कल्पना नव्हती आणि कधीं काळीं येणंहि शक्य नव्हतें.

× × ×

नांवाजलेला चित्रपट होता तो. गर्दीहि बरीच होती. निर्मलेच्याच पुढें बसलेल्या एका मुलीनें मागें वळून तिच्याकडे पाहिलं—तिनें स्मित केलेलें पाहून निर्मलेनंहि केलं—पण तिच्या लक्षांत येईना—कोण ही मुलगी. पाहिल्यासारखी वाटते—आणि इतक्यांत तिच्या त्या खूप मोठ्या आंबाड्याकडे तिचं लक्ष जातांच तिच्या लक्षांत आलं—

—ज्या मुलीला तिनें स्वतःचे कापलेले केस दिले होते तीच ती मुलगी होती-त्या केसांचें सुन्दर गंगावन करून तिनें तें आंबाड्याभोंवतीं गुंडाळलें होतें. तिचं तें गंगावन पहाणाऱ्याच्या लक्षांतहि नसतं आलं-पण निर्मलेनें स्वतःचे केस ओळखले नसते तरच नवल होतं.

—विसरूं पहाणाऱ्या गोष्टी पुन्हां जागृत झाल्या. चित्रपट सुरू झाला पण निर्मलेच्या नजरेपुढून गतकालचा चित्रपट हलेना. त्या थिएटरमधल्या अंधारांतहि त्या मुलीचा आंबाडा तिला स्पष्ट दिसला. तिनें डोळे घट्ट मिटून घेतले-अंधार ज्यास्तच गडद झाला-डोळे मिटून घेतल्यानेंहि गतकालचा चित्रपट दूर होणारा नव्हता-तो ज्यास्तच स्पष्ट दिसूं लागला-एक दिवस तिनें असाच सुरेख आंबाडा बांधला होता. रत्नाकराला फार आवडला तो आणि त्यानें कितीदां तरी...कसल्यातरी चाहुलीनें निर्मलेनें डोळे उघडले. त्या मुलीच्या जवळ एक तरुण बसत होता-आधाराकरितां निर्मलेनें खुर्चीचे हात घट्ट धरले-डोळे मिटून घेण्याचेंहि आतां तिला भान राहिलें नाहीं.

रत्नाकरचा हात त्या मुलीच्या गळ्यांत पडला...निर्मलेची पापणीहि हालत नव्हती...

...रत्नाकराचे ओठ त्या मुलीच्या आंबाड्यावर टेकले गेले...

—कोणीतरी धाडकन् खुर्चीवरून खाली कोसळल्याचा आवाज झाला.

---

# कलेचें मोल ?

" **वा**जव ना एकादं सुन्दर पद, असं काय करतेस अगदींच."

"अग पण—"

"पुरे हं! छान वाजवतेस म्हणून आग्रह करते आहे केव्हांपासून! तुला आला आहे अभिमान. नको जा वाजवूं—"

—आणि खरोखरच मी जरा रागानेंच सुधेपुढील बाजाची पेटी बाजूला ओढली. जें काम माझ्या अर्ध्या तासाच्या आग्रहानें झालं नाहीं—तें एका रागाच्या वाक्यानं झालं चटकन्. सुधेनं पेटी जवळ ओढली. किती सफाईनं चालला होता तिचा हात! वाजविण्यांत सुद्धां किती गोड होती!

—पदाचे सुन्दर सूर बराच वेळपर्यंत त्या लहानशा दिवाणखान्यांत निनादत होते.

मी तिच्याकडून पेटी वाजवून घेतली. सुधा जावयाला निघाली. तिला निरोप देण्यासाठीं मी बाहेर आले–रमेश, आई बरोबर हॉलमध्यें बोलत बसला होता. सुधेला निरोप देऊन मी लगेच परत फिरले.

"काय रमेश, कशी वाजविते माझी मैत्रीण पेटी ?"

"ते काय विचारावं–पेटीच काय पण, घासलेटचा डबासुद्धां छान वाजवील तुझी मैत्रीण."

"खरंच ती वाजवायला लागली कीं, सारख ऐकतच रहावसं वाटतं."

"आणि तिचं तें हिडंबेला लाजविणारं सौंदर्य पहात रहावंसं नाहीं कां वाटत तुला? बाकी पेटी वाजवायला अगदीं योग्य होती बघ तुझी ती मैत्रीण!"

"बस्स कर रमेश, तिच्या सौंदर्याचं नव्हतं विचारलं वर्णन तुला! पेटी कशी वाजवते म्हणून विचारलं तर..."

"अग पण तेंच सांगतो कीं–"

मी पुढचे शब्द ऐकण्यासाठीं थांबलेच नाहीं. पेटीचं नांव काढतांच रमेश चिडत असे. पेटी वाजवलेली ऐकायचं काय पण, नुसती पेटी पाहिली तरी त्याचं मस्तक उठे! मला ठाऊक होतं हें सारं.

—माझी कल्पना, इतकी छान पेटी एकून तरी त्याचा तिरस्कार कमी होईल. पण निराशाच झाली माझी.

रात्री जेवतांना मला पुन्हां दुपारची आठवण झाली आणि मग रमेशचे सुधाबद्दलचें मत अजमाविण्यासाठीं आईला विचारलं—

"आई दुपारी रमेश किती वाजतां येऊन बसला, आठवतं ?"

"साधारण तीन साडेतीनला आला असेल"–माझी खात्री झाली. रमेशनें पेटी ऐकली होती. पण नाहींच राहवलं मला. पक्की खात्री करून घेण्यासाठीं मी पुन्हां विचालंच,

"म्हणजे सुधाची पेटी त्यानं एकली तर–"

" हो तर ! मी आणि रमेश दोघंहि एकत बसलो होतो हॉलमध्यें—मलाहि आज नवल वाटलं—"

" कसलं आई " अधीरतेनें मी मध्येंच विचारलं !

" अगदीं मन लावून पेटी ऐकत होता बघ रमेश ! पेटी सुरू होतांच, मला वाटलं, आतां कांहीं रमेश घरांत ठरावयाचा नाहीं. पण झालं अगदीं उलट—"

—मला कळेना; सुधानं वाजवलेलीं सर्व गाणीं त्यानें ऐकली होतीं. आणि मग ?—माझ्या डोळ्यापुढें दुपारचा प्रसंग उभा राहिला—खोलीच्या बाहेर मी आणि सुधा जेव्हां आलो, तेव्हां किती उत्सुकतेनं त्यानं सुधाकडे पाहिलं—पण तेवढ्याच झटक्यानें मान फिरवली. कां ?

मला वाटतं ऐकण्याचा मोह त्याला आवरला नसावा. पण पेटी थांबल्या-वर मात्र त्याला स्वतःचाच राग आला असावा—

किती विचित्र स्वभाव हा ! एकादी गोष्ट मनाला आवडली तरी ती आवडली असं स्पष्ट बोलण्याची मात्र तयारी नाहीं. दुराग्रहच नव्हे कां हा ?

—आणि ह्या विचारांतच कसं तरी संपवलं जेवण मी.

× × ×

त्या दिवशीं सुप्रभेचा वाढदिवस होता. संध्याकाळच्या पार्टीला जवळ जवळ २०–२५ मंडळी हजर होती. आमच्या गांवचे नवीन आलेले जज्ज आणि त्यांच्यावरोबर त्यांची मुलगी मंगला पण आली होती. फलाहारानंतर करमणुकीचे कार्यक्रम सुरू झाले.

दोघी तिघींनीं गाणीं म्हटलीं. एकीनं दिलरुबा वाजविला.

" तुम्ही वाजवता कां एकादा राग मंगलाताई ? "

" आमच्या मंगलाताई पेटी फार सुरेख वाजवितात हो ! "

जवळ बसलेल्या जज्जसाहेबांनी माझ्या प्रश्नाला उत्तर दिलं.

जज्जसाहेबांची लाडकी मुलगी. त्यांतून सौंदर्याची देणगी असलेली. आग्रहाचा भडिमार सुरु झाला, बऱ्याच वेळानं, बरेच आढेवेढे घेत तिनं पेटी पुढे ओढली. प्रथम मांड रागांतलं एक गाणं सुरू झालं. पहिला चरण जमला.



१.७१८

पण दुसरा चरण मात्र कांहीं केल्या जमेना. दोनतीनदा तिनं प्रयत्न केला—पण, छे !

—"मला नाहीं बाई जमत या पेटीवर." शेवटीं त्या निर्जीव पेटीलाच दोष देण्यांत आला. जज्जसाहेब म्हणत होते.

—" दुसरं चांगलं वाजवना, हें कसलं काढलं रडकं, तें हिराबाईचं 'जनमानस' कीं काय तें वाजवा."

माझ्या छातींत धस्स झालं. आता माझ्या आवडत्या गायिकेच्या गाण्याचं विडंबन होणार कीं काय !

—पण एक दोन ठराविक ताना घेऊन लवकरच तिनं पेटीवादन बंद केलं.

"काय छान वाजवतात मंगलाताई पेटी—" जज्जसाहेबांच्या तोंडाकडे पहात एकानें शेरा मारला आणि त्याचीच 'री' दुसऱ्या दोघातिघांनीं ओढली.

मला नवल वाटलं—त्या लोकांना इतकी खोटी स्तुति करवते तरी कशी ? आणि अशा खोटया स्तुतीचा कंटाळा—पण स्तुतीचा कंटाळा कुणाला आला आहे का ?

—पार्टीला जमलेले बहुतेक लोक घरीं गेले होते. जज्जसाहेब आणि अजून पांचसहा मंडळींच काय ती गप्पा मारीत बसली होती बाहेर व्हरांड्यांत. मी आणि मंगला गप्पा मारीत बसलो होतो.

" इकडे ये ना रमेश " एकटाच उभा असलेल्या रमेशला मी बोलावलं. मंगलेची नि त्याचीं ओळख करून देण्याचा प्रकार मी पार पाडला.

कांहींतरी कामासाठीं मी आंत गेले होते.

"किती छान वाजवता पेटी तुम्ही..." नक्की रमेशचाच आवाज ! माझे पाय तिथेच खिळले. कानांवर विश्वासही बसेना. उपरोधिकपणें तर नसेल बोलत रमेश !

"रोज करता वाटतं प्रॅक्टिस ?"

"मला बाई कंटाळा येतो—केव्हांतरी महिना पंधरा दिवसांनीं लहर लागते झालं वाजविण्याची..."

"रोज वाजवीत नाहीं तरी इतका छान हात चालतो–प्रॅक्टीस कराल तर किती लवकर व्हाल निष्णात–"

आतां सावध झाले मी. एकंदरीत उपरोधिकपणें नाहीं तर ह्याचं बोलणं ? पुरुषी वृत्तीची नीटशी ओळख नसलेली मी."

मी तशीच ऐकत उभी राहिलेअसते तर ? अजुन किती वेळ स्तुती चालली असती ईश्वर जाणे !

मंगला घरी निघून गेली. सबंध दिवस अत्यंत परिश्रम झाले असूनही मला झोप येईना.

दोन महिन्यापूर्वींचा प्रसंग मला आठवला. कोणीहि स्तुती करावी इतकी पेटी वाजविण्यांत सुधा निष्णात होती–त्याच्या अगदीं उलट स्थिती मंगलेची ! —जगांतल्या साऱ्या पेट्या फोडून जाळून टाकाव्यात असं संतापून बोलणारा रमेश आणि–" रोज प्रॅक्टीस कराल तर लवकरच निष्णात व्हाल " असा उपदेश करणारा रमेश ! त्याच्या वृत्तींत इतका फरक पडला तरी कसा ? श्रीमंतीखेरीज मंगलेत होती तरी कसली जादू ?

तिच्या श्रीमंतीवर तर नसेल भुलला रमेश ? पण रमेशला काय कमी होतं ? एकुलता एक मुलगा–जज्जसाहेबांच्यापेक्षांही श्रीमंततीत वरचा नंबर लागला असता त्याचा—

मग ?

मंगलेचं सौंदर्य—आणि क्षणांत सुधा माझ्या नजरे पुढे उभी राहिली. सुधेला पहातांच त्यानें मान फिरवली होती—'हेडंबे'ची उपमा दिली होती.

—सुधा सुंदर असती तर— ???

—पण सौंदर्यावाचून कुठल्याच गुणाचा जय नाहींच कां होत जगांत ? 'सौंदर्य आणि कला' ह्या दोहोंचा मिलाप सुंदर दिसत असेल खरा, पण मग सौंदर्यहीन सुधेची कला ?

---

# नाटकी !

तसंच पाहिलं तर माझा आणि लीलाचा कांहींच संबंध नव्हता. तिचं कॉलेज निराळं—माझं निराळं. मालतीबरोबर ती एकदां आमच्या हॉस्टेलमध्यें आली होती. त्या वेळीं मालतीनेंच तिची माझी ओळख करून दिली. तीच काय ती आमची ओळख. त्यानंतर दोन चारदां रस्त्यांत गांठ पडली असतांना झालेली चार वाक्यांची औपचारिक देवघेव—हाच आमचा परिचय. आणि ह्या एवढया तुटपुंज्या परिचयाच्या जोरावर तिनं माझी परीक्षा करून दिलेला तो शेरा ऐकून मी गारच झाले.

'गर्विष्ठ', 'अभिमानी' आणि त्या दोन्हीं विशेषणांतून अर्थ एकच निघतो म्हणूनच, कीं काय तिसरं विशेषण 'नाटकी' ! तिनं मला दिलेलीं हीं विशेषणं मालतीच्या तोंडून ऐकतांच माझ्यांतला खरा स्वाभिमान खडबडून जागा झाला.

'हो-हो—आहे ठाऊक. मी नाटकी आणि ही काय पण सभ्य. दिवे ओवाळा दिवे. इश्य ! निर्लज्ज नाहीतर—आपणच होवून येत होती ग माझ्याशीं बोलायला—नाहींतर अडलय् माझं खेटर तिच्याशीं बोलायला—मूर्ख कुठली —' मी माझ्यावर झालेल्या अन्यायाचा प्रतिकार करीत होतें. पण छे ! एवढयानच नव्हतं भागणारं. तिनं मला तीन विशेषणं दिली होतीं नाहीं कां ?

'निर्लज्ज, आचरट, मूर्ख, बेशरम—' एक विशेषण ज्यास्त देऊन तिच्यापेक्षा माझ्यांत विद्वत्ता ज्यास्त प्रमाणांत आहे हें मी दाखवून दिलं. माझं मन थोडं शांत झालं.

'अग ती तशीच आहे. स्वतःला अक्कल नाहीं कवडीची, पण दुसऱ्याला नांव ठेवण्यांत नंबर पहिला'–आणि मालतीच्या ह्या दुजोऱ्यानें तर माझं मन खूपच शांत झालं. तोंड एकदां वांकडं करून मी माझ्या मनाचं अजून थोडं समाधान करण्याचा प्रयत्न केला. पण इतका प्रकार करूनहि माझ्या मनाचं पूर्ण समाधान नाहींच झालं. आंतल्या आंत त्या तिच्या उद्गाराची आठवण होऊन माझं मन जळजळत होतं. मी योग्य प्रसंगाची वाट पहात होते आणि अचानक त्या दिवशीं लीलेची रस्त्यांत गांठ पडली. मला पहातांच ती थांबली. नेहमीप्रमाणें तिनं स्मित केलं–पण—

तिचा सूड घेण्याचा केवढा नामी चान्स मिळाला होता मला ! कपाळावर आठ्यांचं जाळं पसरून मी तोंड फिरवून निघून गेले.

माझी खात्री होती. न बोलतां केलेला हा घाव अगदीं वर्मी बसणार. माझ्या मनाची पूर्ण शांती झाली. विजयाच्या आणि समाधानाच्या आनंदानं माझं तोंड प्रफुल्लीत झालं. घरीं येतांच मी सारा प्रकार मालतीला सांगितला. त्यावेळीं लीलाचा झालेला तो पहाण्यालायक चेहेरा–कसं अगदीं रसभरीत वर्णन केलं मी त्याचं मालती पुढें !

'छान केलेस; असंच केलं पाहिजे.'—मालतीच्या शाबासकीनं मूठभर मांस चढल माझ्या अंगावर. आणि खरंच—असेच विजय मिळविण्याचे प्रसंग माझ्यावर अजून बरेच आले असते तर—कोणास ठाऊक किती लठ्ठ

झाले असते मी ! पण असले अनेक विजयाचें प्रसंग प्राप्त झाले असतांनाहि मी ते हातचे सोडून दिले-प्रत्येक दिवस उगवतो आणि मावळतो. काळाच्या गतिबरोबर केवढा फरक पडतो माणसाच्या आचारांत—विचारांत ! आजची माणसाची वृत्ति उद्यां कायम टिकत नाहीं.

त्या दिवशीं माझं मन अगदीं बेचैन झालं होतं. वास्तविक पहातां फार मोठी आनंदाची बातमी कळली होती मला—पण त्या आनंदाच्या बातमीच्या पोटीच माझं मन अगदीं अस्वस्थ करून टाकणारी शक्ति दडली होती. बाह्य जगाला माझ्या मनाची अस्वस्थता कळणं शक्य नसतं. मी खूपच आनंदांत आहे ह्या समजुतीनें माझी मावस बहीण–सुधा माझ्याशीं बोलत होती. तिच्या गप्पा अगदीं रंगांत आल्या होत्या. पण थोड्याच वेळांत उदासिनता तिच्या लक्षांत आली. तिचा आवाज खालीं पडला. ती घुटमळूं लागली. आणि लवकरच तिनें माझा निरोप घेतला. केवढं हलक वाटलं मला !

माणसाचं मन—भूगोलाच्या भाषेंत बोलायचं तर—अगदीं जमिनी-सारखं असतं; जितक्या लवकर तें तापतं तितक्या लवकर तें थंड होतं.

माझं मन लवकरच शांत झालं. दुसरेच दिवशीं मी सुधाकडे गेलें. आद-ल्लेच दिवशीची उदासिनतेची पुसट छटा देखील शिल्लक राहिली नव्हती. मी स्वत: इतक्या आनंदांत होते कीं, सुधाची उदासिनता मला त्यावेळीं कळली नाहीं. मी माझ्याच आनंदांत गर्क होऊन बोलत होते. सुधाची नेहमीची वागणूक—पण त्यांत पडलेला तो फरक, त्या दिवशीं माझ्या लक्षांतहि नाहीं आला. पण दोनच दिवसांनीं माझ्या डोक्यांत चांगलाच प्रकाश पडला. ‘काय ग, सुधेला कांहीं बोललीस होय तूं ?’––मालती मला विचारीत होती.

‘कोण मी ?––छट् मुळींच नाहीं. कां बरं ?’

‘कांहीं नाहीं ग—आपलं सहजच–’ मालतीची नेहमींचीच ही तऱ्हा. माणसाची उत्सुकता वाढवून मध्येंच ‘आपलं सहजच’ म्हणून गप्प रहायचं आणि मग खुप आढेवेढे घेवून त्या ‘सहजच’ मधून मनाला व्याकूल कर-णारं विष सहजासहजीं पाजायचं. पण मालतीचा हा स्वभावच येवढा प्रिय होता मला !

मी थोडा आग्रह करतांच ते ' सहज 'च तिच्या मुखांतून बाहेर पडलं– ' तसं कांहीं नाहीं ग विशेष–पण ती म्हणत होती, तुला अलिकडे भारी गर्व आणि अभिमान चढला आहे आणि तूं तिच्याशीं निटपणें बोलत नाहींस—'

' कोण मी ? '–मी आश्चर्यानें थक्कच झालें.

' जाऊं दे ग–काय बोलेल नू काय नाहीं नेमच नाहीं तिचा–अगदीं चक्रम आहे—' पण मालतीच्या ह्या उद्गारानं माझ्या मनाचं समाधान नाहीं झालं. मला त्या सुधाच्या शब्दांनीं चांगलाच धक्का दिला. अगदीं लहानपणापासून मी आणि सुधा एकत्र खेळलो, हंसलों, रडलोहि. आणि आता त्याच सुधानं– माझ्या बहिणीसंबंधीं असें उद्गार काढावेत ! माझ्या मनाला चांगलाच चटका बसला. कुठेंतरी–कांहींतरी चुकत आहे खास ! त्यावांचून नाहीं बोलणार असं सुधा. सारा प्रकार हळूहळू माझ्या लक्षांत येऊं लागला. त्या दिवशीं ती अगदीं रंगांत येऊन बोलत होती. आणि मी मात्र तेवढीच उदासीन होते. खरं आहे. त्या वेळीं माझं मन नव्हतं ठिकाणावर, पण त्याची तिला कोठून येणार कल्पना ? हरघडी दुसऱ्याचं मन ओळखण्याचा प्रयत्न करतो कोण ! आणि तसा प्रयत्न करूनही ते कळेलच कशावरून ? खरंच, काय दोष आहे सुधेचा ?—मग माझा दोष ? पण–माझा तरी कसा म्हणतां येईल ? मन ताब्यांत ठेवून तिच्या आनंदांत मी भाग घ्यायला पाहिजे होता. पण नेहमींच मनाला फसवून असला नाटकीपणा—क्षणांत माझ्या अंगांतून चमक निघाली–नाटकी !—मला लीलाची आठवण झाली.

लीला आणि सुधा.

लीलेनं केलेली माझी निंदा ऐकतांच मी संतापले होते. वाईट वाटलं–पण फार थोडं. सुधा—प्रत्यक्ष मावस बहिणीनं केलेली निंदा ऐकतांच वाईट वाटलं–संताप आला पण थोडा–आणि म्हणूनच विचारशक्ती जागी झाली. दोघींत एकवाक्यता होती. अभिमानी–गर्विष्ठ–पण लीलानं एक जादा विशेषण दिलं होतं—नाटकी !

केवढं महत्व होतं या तीनच अक्षरांच ! लीलेला दोनतीनदांच मी भेटलें होते. मेंदूला थोडा धक्का देतांच तिच्या माझ्या भेटीचा तो प्रसंग मला आठवला.

त्या दिवशीं माझा भाऊ जरूरीच्या कामासाठीं मुंबईस आला होता. तो मला भेटायला हॉस्टेलमध्यें आला तेव्हां मी बाहेर गेले होते. त्यानं ठेवलेल्या निरोपावरून तो त्याच दिवशीं गांवीं परत जाणार होता. भावाची भेट घेणं अत्यंत आवश्यक होतं. मी तडक तो उतरला होता त्या हॉटेलमध्यें गेले, पण तो बाहेर गेलेला. तो सबंध दिवस त्याच्या शोधार्थ मी हिंडत होते; पण— त्याची भेट झालीच नाहीं त्या दिवशीं. संध्याकाळीं सात वाजतां निराश मनानं हॉस्टेलकडे येत असतांनाच त्या कोपऱ्यावर लीलेची गांठ पडली. मन निराशेनं भारावलेलं असतांना तोंडावर उसनं स्मित आणून मी तिच्याशीं मोजके चारच शब्द बोलले, आज ते शब्द नीटसे आठवतहि नाहींत मला.

'मालती—' मालती माझ्याकडेच पहात होती.

'अशी पहातेस काय ?'

'केव्हांपासून बसली आहेस एकाद्या निर्जीव पुतळ्याप्रमाणें तूं !'—

खरंच एकाद्या निर्जीव पुतळ्याप्रमाणें बसले होते खरी मी. पण माझ्या मनांत चाललेले ते विचार—केवढी सजिवता होती त्यांत !

'मालती, माझं एक काम करशील ?—हें बघ उद्यां लीला-कुळकर्णीला घेवून ये. अगदीं जरूर. विसरूं नकोस हं—' मालती आश्चर्यानें माझ्याकडे पहात होती. जरा गंमत करण्याची इच्छा झाली मला—

'चांगलाच दाखवायचा आहे तिला माझा नाटकीपणा—' मालतीचा आनंद गगनांत मावेना. दुसरे दिवशीं लीला आली.

कांहींतरी अपूर्व देखावा दिसणार ह्या आशेनें मालती आमच्या दोघींच्या तोंडाकडे पहात होती—आणि खरोखर तिला अपूर्व देखावाच दिसला. आम्ही दोघी अगदीं मनमोकळेपणानें बोलत होतो. माझ्याशीं असलेली मैत्री वाढावी ही लीलाची इच्छा मला स्पष्ट दिसत होती. आणि त्या दिवसापासून आमची मैत्री खूपच वाढली. आकाशांत ढग येतात आणि जातात—कायम टिकत नाहींत. सुधेचं मन केव्हांच स्वच्छ झालं होतं.

माझी आणि लीलाची मैत्री—मालतीला पडलेलं कोडं अजूनहि सुटलं नाहीं.

---

# १९३६ चें कॅलेंडर

१९३६ चें कॅलेंडर अजूनही त्याच्या खोलींत, त्याच्या टेबलासमोर तसंच होतं. चालू वर्षांची कितीतरी कॅलेंडर्स होती त्याच्या घरांत. पण तें जुनें—तीन वर्षांपूर्वीचं कॅलेंडर—कसं अगदीं नव्यासारखं दिसे. त्यानें घेतलीच होती तितकी काळजी.

होय. तें कॅलेंडर म्हणजे त्याचं शांतिस्थान. कोर्टांतून एकादी गुंतागुंतीची केस चालवून दमून भागून घरीं येतांच त्याची दृष्टी प्रथम त्या कॅलेंडरकडे वळे, नजर स्थीर होई. आणि क्षणांत त्याचा कोमेजलेला, त्रासलेला चेहरा प्रफुल्ल होई. झालेले श्रम तो पार विसरून जाई.

देव–दैव–कशावरच त्याचा विश्वास नव्हता. देवाची मूर्ति पाहून त्याचे हात कधींच जोडले गेले नाहींत. पण—

सकाळीं उठतांच त्या कॅलेंडरसमोर येऊन उभं रहावं–दृष्टि स्थिर व्हावी–क्षणमात्र जगाचा विसर पडावा. कधीं कधीं न कळत हात जोडावेत. अगदीं रोजचा कार्यक्रम. रात्रीं झोपतांना अगदीं असाच प्रकार.

असं होतं तरी काय त्या कॅलेंडरमध्यें विशेष ? तसंच पाहिलं तर अगदीं साधं चित्र. लहान मुलासाठीं शक्तिवर्धक औषधाची जाहिरात ती–असणार काय त्यांत विशेष ?—एक बाई. बरं तिचं सौंदर्य असाधारण म्हणावं तर तसंहि नाहीं आणि तिच्या मांडीवर एक दीड वर्षाचं मूल. असं तें अगदीं साधं चित्र पण केवढं वेड लावलं होतं त्या चित्रानं त्याला !

त्या दिवशीं उठतांच नित्याप्रमाणें तो कॅलेंडरकडे वळला मात्र—कॅलेंडर जागेवर नव्हतं. एकाद्या दगडी पुतळ्याप्रमाणें तो उभा राहिला. हळूहळू त्याला आठवलं. रात्रीचा तो सोसाट्याचा वारा आणि पाऊस. त्यानं चौफेर नजर फेकली. तिन्ही खिडक्या सताड उघड्या होत्या. वाऱ्याबरोबर उडून बाहेर तर...नुसता विचारहि त्याला असह्य झाला. टेबलाखालीं पाहिलं. आजुबाजूला नजर टाकली. आणि आतां तर त्यानें खोलीचें कोपरेन् कोपरे शोधण्यास सुरुवात केली. त्याच्यासाठीं चहा घेऊन आलेला नोकर दारांतच थांबला. "काय शोधता साहेब ?"

"कॅलेंडर." खुर्चीखालीं वांकून पहातां पहातांच त्यानें उत्तर दिलं. 'ट्रे' टेबलावर ठेवून नोकरही शोधूं लागला.

पुस्तकाच्या ढिगाऱ्याखालीं कॅलेंडर जाणं शक्य नाहीं–त्याला हें कळत कां नव्हतं ? पण तो शोधीतच होता. इतक्यांत त्याचा नोकर ओरडला—"ते बघा–पलंगाखालीं" एखाद्या लहान मुलासारखी त्यानें उडी मारली. पलंगाखालीं रांगतच जाऊन तें कॅलेंडर त्यानें बाहेर काढलं. त्यावर पडलेली धूळ पुसताच त्याची नजर त्या फाटलेल्या कोपऱ्यावर गेली. "छे ! चांगली फ्रेमच केली पाहिजे." तो स्वतःशींच पुटपुटला. लगेच त्यानें मिस्त्रीला जवळ बोलावलं. नुसतं चित्र ठेवून बाकीचा किती भाग कापावयाचा, चौकट कोणत्या रंगाची, किती रुंद बसवावयाची हें मिस्त्रीला समजावून सांगितलं.

" आणि हें बघ चांगली मोठी फ्रेम करायला सांग–चांगली"–इतक्यांत त्याची नजर वडिलांच्या फोटोकडे गेली. " हं बरोबर तेवढी. दादांचा फोटो आहे ना तेवढी मोठी फ्रेम करायला सांग समजलं ? " मिवानें मान हालवली.

त्या दिवशीं दुपारीं कोर्टांत जाण्यापूर्वीं रोजच्या संवयीप्रमाणें तो त्या टेबलासमोर येऊन उभा राहिला. कॅलेंडरची ती मोकळी जागा—तो कोर्टांत आला. पण—

रोज शाळेला जातांना आईला दारांतून ओरडून सांगणारा मुलगा, एखादे दिवशीं तसाच आईला न सांगतां शाळेंत यावा अन् मग त्याला जसं चुकल्या चुकल्यासारखं वाटूं लागतं, अगदीं तस्संच त्याला वाटूं लागलं.

त्या रात्रीं झोंपण्यापूर्वीं–तीच ती रिकामी जागा त्याच्या डोळ्यापुढें आली. " जरा चुकलच आपलं. ताबडतोब समोर बसून ती फ्रेम करून आणायला सांगायला पाहिजे होतं मिवाला. " त्यानें लगेच मिवाला हाक मारली—" फ्रेम केव्हां तयार होणार ? "

मोठमोठ्या महत्वाच्या गोष्टी विसरून जाणाऱ्या विसरभोळ्या मालकाची ही साध्या गोष्टीबद्दलची भलतीच उत्सुकता पाहून मिवाला वाटलेलं नवल त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटलं.

" उद्यां दुपारीं आणतो. "

" उद्यां दुपारीं—म्हणजे उद्यां सकाळीं—हं बरं " पण त्याचा चेहरा नाराजच दिसला.

दुसऱ्या दिवशीं जरा उशीराच तो जागा झाला. मच्छरदाणीच्या जाळींतून त्यानें टेबलावरच्या घड्याळाकडे नजर टाकली. टेबलावर ठेवलेली ती फ्रेम ! झटकन् तो उठला.

अगदीं निरखून तो ती फ्रेम पहात होता. छानच दिसत होतं तें चित्र आतां. बराच वेळ तो पहात होता. नंतर त्यानें हळूंच ती फ्रेम जागच्या जागीं बसविण्यासाठीं हात उचलला. पण पुन्हां मागें घेतला.

" कॅलेंडर शोभून दिसत होतं ह्या जागेवर. पण आतां ही फ्रेम—अंहं मग ?" त्यानें चौफेर पाहिलं. वडिलांच्या फोटोसमोरची ती रिकामी जागा—त्यानें पुन्हा एकदां हातांतल्या चित्राकडे पाहिलं. वडिलांच्या फोटोएवढीच ती फ्रेम—एकदम खुशीनें त्यानें मान हालवली.

तात्काळ तें चित्र त्या ठिकाणीं लावण्यांत आलं. कोर्टांत जाण्याच्या वेळेपर्यंत कितीदां तरी त्यानें त्या चित्राकडे पाहिलं.

जरा उशीराच तो कोर्टांत आला. कोर्टाच्या आवारांत जमलेली ती जादा गर्दी पाहातांच त्याला आठवलं—एका वेश्येनें आपल्या धनाढ्य प्रियकराचा केलेला खून आणि ती केस आज कोर्टापुढें चालणार होती.

शांतपणें तो आपल्या जागेवर जाऊन बसला. खिशांतून रुमाल काढून तोंड पुसता पुसतांच त्यानें समोर पाहिलं. केवढ्यांदा दचकला तो! त्याच्या त्या दचकण्यामुळं त्याच्या शेजारीं बसलेला दुसरा वकीलदेखील दचकला.

आरोपीच्या पिंजऱ्यांत बसलेली ती बाई. डोळे फाडून तो तिच्याकडे पहात होता. त्याची तिची ओळख नव्हती. छे! त्यानें तिला कधीं पाहिलंहि नव्हतं आणि तरीही...

इतक्यांत-इतका वेळ खालीं लावलेली नजर तिनें वर केली. आधारासाठीं त्यानें खुर्चीचा हात घट्ट घट्ट धरला.

तेच ते डोळे. तीच ती मातृप्रेमानं ओथंबलेली नजर. चेहेऱ्याची ठेवणही अगदीं हुबेहुब.

सरकारी वकील आरोपीचा गुन्हा समजावून सांगत होता—

" गेल्या तीन वर्षांपासून सुमित्राबाई ही..."

सुमित्रा-सुमित्रा-त्याच्या डोळ्यासमोर कॅलेंडरवरच्या कोपऱ्यांतली ती सोनेरी अक्षरं नाचूं लागलीं—' सुमित्रा देवी. '

शंकाच नव्हती. हीच ती. पण—पण कसं शक्य ?

त्याला कांहींच सुचेना. डोकं बधीर झालं. समोर खुनाची हकिकत अगदीं रंगांत आली होती.

त्याला एकहि शब्द ऐकू येत नव्हता. डोक्याला हाताचा आधार देत तो अजूनहि तिच्याकडेच पहात होता.

त्या दिवसापुरतं खटल्याचं काम संपलं.

" दिसते पहा कशी सज्जन, गोगल गाय. "

" अहो किती जणांचे गळे कापलेत ह्या महामायेनें आजपर्यंत. तो कुंदनलालचा मोठा मुलगा हिच्या पायींच वेडा—"

" तें तर जाऊं द्या. पण परवां त्या डॉ. मोहनलालवर मोहपाश घालून कवडीला महाग केला. "

" बेशरम—कुलटा-"

त्याला बाररूममध्यें बसणं असह्य झालं. जड पाऊलानं तो घरीं परतला. खोलीच्या दारांतच त्याचे पाय अडखळू लागले.

" असंच जाऊन भिवाला तें चित्र फेकून द्यायला सांगावं. " पण मनांत आलेला विचार आचारांत नाहीं उतरला. तो तसाच आंत गेला. समोरचं तें चित्र. ती आई. तें बाळ. कितीतरी वेळ तोंडावर उशी घट्ट धरून पडला होता. त्याला सारं आठवूं लागलं—

त्याची आई वारली तेव्हां तो सारा बारा वर्षांचा होता. आईच्या मृत्यूनंतर त्याचं घर—तें चिमुकलं नंदनवन-वृक्ष-रखरखीत वाळवंट बनलं. त्यांतून अत्यंत तापट, संतापी स्वभावाचे त्याचे वडील. आईची आठवण हेंच काय तें त्याच्या जिवाचं समाधान. आईची मूर्ति डोळ्यासमोर आणून तासन्तास तो बोलत राही. वाढत्या वयाबरोबर बुद्धिहि वाढूं लागली. आणि त्याचं तेंहि समाधान दुरावत चाललं.

त्याच्या घरांत कितीतरी चित्रं-फोटो होते. पण त्याच्या आईचं छायाचित्र धुंडुन धुंडूनहि याला नाहीं मिळालं. जें नव्हतंच तें मिळणार कोठून ?

तीन वर्षांपूर्वी तो वकिलीची परीक्षा पास झाला. आणि त्याच वर्षी त्याचे वडील त्याला जगांत एकटा सोडून निघून गेले. वडीलांच्या मृत्यूचं दुःख

त्याला झालं. अगदीं खूप झालं. पण अजूनही आईची आठवण त्याला सोडीत नव्हती. आईच्या मृत्यूचं दु:ख अजूनहि कसं अगदीं ताजं होतं.

दरवर्षीप्रमाणें त्या वर्षीहि बरीच कॅलेंडरं त्याच्याकडे भेटीदाखल आली. त्यापैकीं दोन त्यांकडे खिडकीतून आशाळभूत नजरेनं पहाणाऱ्या माळ्याच्या पोराला देऊन टाकली.

एका लहान मुलाचं चित्र असलेलं कॅलेंडर त्याच्या शेजारची बेबी घेऊन पळाली. आणि त्याला भेटायला आलेल्या त्याच्या दोन मित्रांनीं तीन लांबवली.

नेहमींच्या पद्धतीप्रमाणें फक्त दोन कॅलेंडरं त्यानें खोलींत ठेवली. एक टेबलावर. अन् दुसरं मोठ्या, ठळक आंकड्याचं समोरच्या भिंतीवर.

आणि असाच एक दिवस जेवण्यासाठीं तो स्वयंपाक घरांत गेला असतांना त्याची नजर त्या कॅलेंडरवर पडली. वेळेचं भान त्याला राहिलं नाहीं. आणि कितीतरी वेळ तो त्या कॅलेंडरवरच्या चित्राकडे पहात राहिला. त्या चित्रांतली ती बाई. तिच्या मांडिवर बसलेलं तें गुटगुटीत गोजिरवाणं बाळ. आपल्या बाळाकडे लागलेली ती आईची नजर. त्या चित्रांतली ती बाळाची आई आणि त्याची आई ! अगदीं अस्संच भव्य कपाळ. सरळ नाक. पण त्याहिपेक्षां ते डोळे. केवढं—केवढं साम्य ! आणि त्याच दिवशीं तें कॅलेंडर त्याच्या टेबलासमोर लावलं गेलं. स्वयंपाकाच्या सोयीसाठीं दुसरं कॅलेंडर देण्यांत आलं.

चेहेऱ्यावरचं तें पावित्र्य. डोळ्यांतून ओसंडणारं मातृप्रेम. आणि ती वेश्या !

आवेगानं त्यानें तोंडावरची उशी दूर भिरकावली. त्या चित्रासमोर तो जाऊन उभा राहिला.

"वेश्या—खुनी वेश्या—पण-पण बाळाची आई-आई." त्यानें जोरानें मान हालविली. त्याचा चेहरा निश्चयी दिसूं लागला.

दुसरे दिवशीं तो जरा लवकरच कोर्टांत गेला. कालच्यापेक्षां आज गर्दी दुप्पटीनें वाढली होती. कोर्टाचं काम सुरुं झालं आणि तितक्याच लवकर

संपलं. आरोपीनं गुन्हा कबूल केल्यावर राहिलं काय ? पुरावा–चौकशी–नुसता फार्स !

तिच्या बाजूनें बचावाचं काम करण्याची त्याची उत्कट इच्छा असूनहि उपयोग झाला नाहीं. तिनेंच तें नाकारलं.

शेवटीं तो दिवस उजाडला. आरोपीला योग्य शिक्षा सांगण्यांत आली— काळें पाणी !

तिनें मोठ्यानं हंबरडा फोडला—" मनू–मनू. "

" आई–आई " तिच्या बाळानं ' ओ ' दिली.

त्यानें चमकून मागें वळून पाहिलं. फाटके कपडे घातलेल्या एका माणसानं हातावर घेतलेला तो पांच वर्षांचा मुलगा.

चित्रांतल्या बाईच्या मांडीवर बसलेला मुलगा क्षणांत त्याला आठवला.

" आई–आई " " मनू–मनू " आणि त्या दोन जिवांना दोन दिशेला नेण्यांत आलं !

* * *

वेश्येचं–खुनी वेश्येचं पोर. आणि त्या पोराला त्यानें स्वत:च्या घरीं आणलं. कसली भयंकर गोष्ट ती ! लोक नाहीं नाहीं तें बोलत होते. त्याला तें सारं ऐकूं येतें होतं.

" अहो, कोण कुणाला करतो जवळ–असेल असंच कांहीं काळंबेरं–त्यावांचून—"

" अजून लग्न नाहीं तेव्हां वाटतच होत—असला कांहीं प्रकार—"

" कुणी सांगावं ? स्वत:चाच असेल कदाचित् मुलगा—"

जोंपर्यंत त्याच्याबद्दल लोक बोलत होते, तोपर्यंत त्यानें त्याची पर्वा केली नाहीं. शांततेनें तो सारं कांहीं सहन करीत होता. पण त्याच्या घरीं नित्य येणाऱ्या त्याच्या मित्रांनीं आतां एक नवीनच माहिती पुरविण्याचा मक्ता घेतला—

" अहो, वडिलांच्या फोटोसमोर लावलाय फोटो. तरी वाटलंच होतं असाच कांहीं प्रकार असणार. बापहि कांहीं कमी नव्हता. दुसरं लग्न केलं नाहीं आणि असले खेळ—"

प्रत्यक्ष स्वतःच्या वडिलाबद्दल हें असं ऐकतांच मात्र तो बावरला. आपल्यामुळें वडिलांच्या नांवाला लागणारा कलंक—आज आपले वडील असते तर ! आवडलं असतं का त्यांना हें सारं ?—

वडिलांचा तो रागीट चेहेरा त्याच्या नजरेपुढें दिसूं लागला—मग चुकलं का आपलं ?—त्याला कांहींच सुचेना. भीतभीतच त्यानें वडिलांच्या फोटोकडे पाहिलं.

भीति–आदर–प्रेम–आनंद–निमीषांत चारहि भाव त्याच्या चेहऱ्यावर उमटून गेले.

किती प्रेमानें, कौतुकानें पहात होते त्याचे वडील त्याच्याकडे ! ती त्याची हंसरी मुद्रा, जणुं ते विचारीत होते—

खुळ्या, अजून नाहीं ओळखलंस तूं मला ?"

पहाता पहाता तोहि हंसूं लागला. त्याच्या पायाला आपल्या चिमुकल्या हातानें विळखा घालून त्याच्याकडे पहाणारा मनू–कसा अगदीं गोड हंसत होता !

---

# कलावंत

"हा तुमचा पगार–आणि असं पहा आम्ही घेणार आहोंत कांहीं दिवस विश्रांति, तेव्हां दुसरीडे पहा तुमच्या नोकरीचं"

...कर्णमधुर गाण्यामुळें प्रसिद्धीस आलेल्या निर्मलादेवी आपल्या सारंगीवाल्यास–श्रीरंगास–नोकरीवरून कमी केल्याची सूचना देत होत्या.

नकळत श्रीरंगानें हात पुढें करून पैसे घेतले. नोकरीवरून काढून टाकण्यास दाखविण्यांत आलेलें कारण सर्वस्त्री खोटें होतें हें तो जाणत होता. अवध्या आठच दिवसांनीं निर्मलादेवी उत्तर हिंदुस्थानांत दौरा काढणार होत्या. गेल्या सहा महिन्यांत त्यानें चार ठिकाणीं नोकरी केली होती. महिना दीडमहिना होतांच त्याला नोकरीवरून काढून टाकल्याची सूचना देण्यांत येई. सारंगीवादनांत तरी त्याचा हात धरणारा कोणी सांपडला नसता. नुसत्या

सारंगीच्या सुरावर त्यानें अनेकदां धन्यवाद मिळविले होते. आणि असें असूनहि नोकरी टिकविण्याच्या कामीं तो अपेशी ठरे !

त्याच्याकडून सारंगीवादनाचा पहिला धडा घेणारे सारंगीवाले पोट भरून खात होते—मग असं कां व्हावं ?

खूप विचार करूनहि त्याला कळेना. स्वतःच्या अंगांतले दोष अजमावून पहाण्याचीहि त्यानें शिकस्त केली. पण एकहि दोष त्याला सांपडेना. स्वतःचे दोष समजावून घेण्याइतकी तल्लख बुद्धि श्रीरंगाच्या ठिकाणीं नव्हती हेंच खरं !

त्यानें निश्चय केला, आतां नोकरी म्हणून करायची नाहीं. आपली सारंगी अन् आपण ! आणि निश्चयाप्रमाणें त्यानें दोन महिने काढले. त्याच्या आयुष्यांतले अत्यंत आनंदाचे दिवस होते ते. त्याचा दिवसांतला बहुतेक वेळ सारंगीच्या तारा छेडण्यांत जाऊ लागला. पूर्वीपेक्षां कितीतरी पटीनें त्याचा हात सफाईनें सारंगीवर चालूं लागला. आवडत्या कलेची मनसोक्त सेवा करण्यांत त्याला जगाचाहि विसर पडला—पण असं जगाला विसरून जगतां आलं असतं तर, असे कितीतरी कलावन्त जिवंतपणें जगले असते !

पोटाची आग सारंगीचे सूर कशी शमविणार ?

आणि केवळ पोटासाठीं त्यानें पुन्हा जगाकडे धांव घेतली.

* * *

थिएटर नुसतं माणसांनीं फुलून गेलं होतं. एका नवोदित सुंदर गायिकेच्या मधुर गायनाचा कार्यक्रम ! थिएटर अपुरं पडणारंच !

गायिकेनें हंसत मुखानें स्टेजवर प्रवेश केला. तंबोऱ्याच्या बेसूर तारा सुरांत लावल्या. श्रीरंगानेंहि आपली सारंगी हृदयाशीं घेतली. गाण्यास सुरवात झाली.

ज्या मोठ्या अपेक्षेनें थिएटर भरलं होतं, ती अपेक्षा गाणं सुरू होतांच खोटी ठरली अवघ्या चारच पदांनीं ! थकलेल्या गायिकेनें आतां जोगीया आळविण्यास सुरवात केली. रात्रीची ती शांत वेळ. थिएटर लोकांनीं चिक्कार

भरलेलं. जोगीया रागाचें मुळचे मधुर व कंपायमान स्वर ! श्रीरंग देहभान विसरला ! थकलेली गायिका विश्रांतीसाठीं वरचेवर थांबू लागली. आणि केवळ ती नादलुब्धता टिकविण्यासाठीं श्रीरंगाची सारंगी बोलूं लागे...

इतका वेळ कंटाळलेल्या लोकांना नवजीवन मिळालें. टाळ्यावर टाळ्या पडूं लागल्या. आरक्त गायिका रागानें अधिकच लाल झाली ! देहभान विसरलेल्या श्रीरंगाला त्याची दादहि नव्हती. स्वतःच्या हृदयाचा आश्रय देऊन तो सारंगींतून स्वर काढून सर्वांच्या हृदयाच्या तारा छेडीत होता. जीवाचे कान करून लोक सारंगी ऐकत होते...दर क्षणाला त्याचा गौरव होऊं लागला. गायिकेचा आवाज वरचेवर खालीं पडूं लागला.

आणि टाळ्यांच्या कडकडाटांत कार्यक्रम संपला. सुरवातीच्या टाळ्या गायिकेच्या अज्ञात गौरवाबद्दल होत्या. शेवटच्या टाळ्यांचा गजर श्रीरंगाच्या गौरवास्तव होत होता आणि हें न समजण्याइतकी गायिका खुळी खास नव्हती !

लोक घरीं जातांना बोलत होते, " अशी गोड सारंगी जन्मांत नव्हती कधीं ऐकली ! "

× × ×

रोजच्या प्रमाणें दुसरें दिवशीं श्रीरंग तालमीच्या वेळीं गायिकेच्या घरीं दाखल झाला. दरवाजा उघडून तो आंत जाणार तोंच—

" तें कांहीं नाहीं दादा, आजच्या आज त्या श्रीरंगाचा पगार चुकता कर. जणूं कांहीं काल रात्रीं त्याचाच होता कार्यक्रम–वन्समोअर्स पाहिजेत नाहीं कां मिळावयाला ? घरीं बसा म्हणावं आतां स्वतःचेच जलसे करीत. "

श्रीरंगानें उचललेलें पाऊल मागें घेतलें. आंत जाऊन कांहींच उपयोग नव्हता. फक्त पैसे घेण्यासाठीं—पण तो नुसत्या पैशाला भुकेलेला नव्हता.

स्वतःची चूक त्याला समजून चुकली. जड पावलानें तो घरीं आला. त्याची सारंगी रोजच्याच ठिकाणीं होती.

पण बाहेरून येतांच सारंगीला हृदयाशीं कवटाळणारा श्रीरंग आज रोजचा नव्हता.

एकाएकीं त्याच्या गौरवास कारणीभूत होणारी तर दुसऱ्याच क्षणीं त्याचा नाश करणारी !—

छे ! तें कांहीं नाहीं. आजपर्यंत सारंगीवादनांत मिळविलेलं सारं प्रभुत्व विसरून जायचं—अगदीं इतर सारंगीवाल्याप्रमाणें ह्या पुढें सारंगी वाजवायचा त्यानें निश्चय तर केला !

किती जोरानें ओढली त्यानें सारंगीवरची गवसणी ! सुरांत लावलेली सारंगी क्षणांत बेसूर झाली ! ! सूर लावण्याचा त्यानें थोडाहि प्रयत्न केला नाहीं......

स्वत:ला—स्वत:च्या कलेला विसरण्यासाठीं चाललेला त्याचा तो निष्फळ प्रयत्न ! जिवाचें मोल देऊन मिळविलेली कला कलावन्ताला विसरतां येईल कां ?

तो वाजवीत होता. सारंगी अत्यंत बेसूर वाजत होती. त्यानें डोळे घट्ट मिटून घेतले. त्याला सहन होईना. सारंगीच्या प्रत्येक स्वराबरोबर त्याच्या हृदयाचे सूरहि बेसूर होऊं पहात होते. त्याचा हात सारंगीवर फिरत होता. त्याच्या डोळ्यांतून वाहणारे ते अश्रू !—

—अत्यंत आवेगानें त्यानें ती सारंगी हृदयाशीं घट्ट धरली. तो शुद्धीवर आला. तोंडावरून, केसावरून त्यानें एकदा हात फिरवला. हलक्या, हळूंवार हातानें त्यानें बेसूर सूर सुरांत लावले. त्याचे डोळे पुन्हा पाण्यानें भरून आले—स्वत:च्या निष्ठुरपणाची त्याला जाणीव झाली !

हळूंवारपणें त्याचा हात सारंगीच्या तारा छेडीत होता. किती गोड बोल बोलत होती त्याची सारंगी आता !

कितीतरी वेळ तो सारंगी वाजवीत होता. नंतर त्यानें सारंगी हळूंच खालीं ठेवली. त्याचे डोळे क्षणभरच अभिमानानें तळपले—

"हरकत नाहीं—नोकरी नाहीं मिळाली तर उपाशी मरेन—पण माझी कला कधींच नाहीं टाकणार मी. तें शक्य नाहीं—"

आणि किती मोठ्यानें हंसला श्रीरंग !

---

# फसवं समाधान !

त्या सोनेरी पिंजऱ्यांतल्या मैनेकडे पहातांच तिला स्वतःच्या जीवनाची तीव्र जाणीव होई-तिची ती दीन, करुण दृष्टि आजूबाजूस वळतांच सभोंवतालचा तो चिरेबंदी वाडा आणि त्या दगडाच्या भक्कम भिंती !

—असाह्यतेनें ती डोळे घट्ट मिटून घेई आणि मग मिटलेल्या डोळ्यांतून वाहाणारा तो अश्रूंचा पूर-पण तेवढ्यांत कोणाची चाहूल लागली कीं, अश्रु पुसेल जात-हंसत मुखानें ती पुन्हा घरांत वावरूं लागे—

दिवस लोटत होते. सोनेरी पिंजऱ्यांतील ती मैना आणि त्या घरची गृहलक्ष्मी-समदुःखी असलेले ते दोन जीव-आयुष्याचा एकेक दिवस संपवीत होते.

घरधन्याला पहातांच ती मैना गोडगोड बोलूं लागे. घटकाभर करमणूक होई तिच्या धन्याची...पण...

आकाशात स्वच्छंदानें उडणारा तो पक्षाचा–तिच्या जातभाईंचा थवा पाहिला कीं, ती देहभान विसरून जाई–भोंवतालचा त्या भक्कम पिंजऱ्याचा तिला विसर पडे; पंख फाडफाड करून, उंचउंच भरारी मारण्याची ती प्रयत्न करी–आणि शेवटीं असाह्यतेनें खालीं पडे—किती तरी वेळ ती तशीच कांहीं हालचाल न करतां पडून राही—

आणि एक दिवस स्वतःच्याच पंखांत तोंड खुपसून पडलेली ती दीन मैना पहातांच तिचे डोळे पाण्यानें भरून आले—तिनें कसला तरी निश्चय केला आणि धावतच जाऊन त्या पिंजऱ्याचं दार उघडलं...

क्षणभरच बावरलेली ती पिंजऱ्यातली मैना–पण दुसऱ्याच क्षणीं तितक्याच आवेगानें ती पिंजऱ्याबाहेर पडली आणि क्षणार्धांत त्या निळ्या आकाशांत दिसेनाशी झाली...

रिकाम्या पिंजऱ्याकडे ती अतृप्त नजरेनें पहात होती ..' असंच–असंच जर मलाहि कोणी बंधमुक्त करील तर...'

× × ×

मनुष्य स्वतःच दुःख निर्माण करून रडत बसतो-आणि ह्यापैकींच ती एक होती.

'कर्तव्य–स्वार्थत्याग'–सोनेरी मुलाम्यानें झळकणाऱ्या ह्या शब्दांचा तिला मोह पडला नसता, तर आज ती तिच्या लाडक्या मोहनशीं लग्न करून सुखी झाली असती–जगाची तिला केव्हांच पर्वा वाटत नव्हती. तिच्या मोहनसाठीं समाजाचीं दुबळी बंधनं एका क्षणांत तिनें तोडलीं असतीं-आणि मोहनच्या सहवासांत नंदनवन निर्माण केलं असतं तिनं–पण त्यामुळं आईवडिलांना होणारं दुःख नजरेपुढें येतांच ती भांबावली–कर्तव्य–स्वार्थत्याग आणि ह्याच उदात्त भावनेच्या मागें तिला लपण्यास मुबलक जागा मिळाली.

स्वतःच्याच जातींतल्या तिला अनुरूप अशा एका श्रीमान् गृहस्थाची

ती धर्मपत्नी झाली–स्वतःचं कर्तव्य पार पाडलं तिनं–स्वार्थत्यागाचं समाधान तिला लाभलं–पण क्षणभरच––

नुसत्या उदात्त भावनेला हृदयाशीं धरून जगणं शक्य नाहीं, हें तिला कळून चुकलं—पण फार उशीरा !

एकाची धर्मपत्नी असूनही ती रात्रन् दिवस तिच्या मोहनसाठीं तळमळत होती–झुरत होती, कर्तव्यासाठीं स्वतःच्या सुखाची राखरांगोळी करणारी ती केवढं मोठं पाप करीत होती !

रात्रन् दिवस तिच्या नजरेपुढें मोहन दिसे. त्याला भेटण्यासाठीं, डोळे भरून पहाण्यासाठीं ती नुसती धडपडत होती–पण—

तिनें स्वतःच स्वतःभोंवती निर्माण केलेला तो भक्कम पिंजरा–त्यांतून बाहेर पडणं शक्य नव्हतं आतां ! तिला हें कळत होतं आणि तरीही एखादे वेळीं वेडा विचार मनांत येई–'ह्या बंधनांतून बाहेर पडलें तर ?' क्षणभरच ती स्वतःला विचारी–हवेंत उंच उंच मनोरे रचतांना विसर पडत नाहीं कोणाला ?

× × ×

रिकाम्या पिंजऱ्याकडे ती पहात होती. आदलेच दिवशीं त्या सोनेरी पिंजऱ्यांतून बाहेर पडून उंच उंच भरारी मारणारी ती मैना ! आतां ती आपल्या जोडीदाराबरोबर स्वच्छंदानें—

ती मनांत चित्र रंगवीत होती.

'बाईसाब, आपली मैना–' पण गड्याचं बोलणं पुरं होण्याआधींच तिनं खुलासा केला.

'मींच सोडून दिली तिला.'

'नव्ह–नव्ह बाईसाब, आपली मैना परसांतल्या बागंत घायाळ होऊन पडलीया.'

ती गड्याकडे पहातच राहिली.

'आपली नसेल रे ती मैना'–तिचा आवाज खोल निश्चत होता.

'असं कसं होईल बाईसाहेब-आपली मैना मी नाहीं व्हय वळखणार- आज इतकी वरसं आपल्या घरांत व्हती-आपलीच हाय ती मैना'

जड पावलानें ती बागेंत आली. ज्या मैनेला बंधमुक्त करून अवघे चोवीस तासही झालें नव्हते त्याच मैनेचा मृतदेह तिथं पडला होता.

—क्षणापूर्वीच ती त्या मैनेच्या स्वच्छंदी जीवनाचं सुंदर चित्र रंगविण्यांत दंग झाली होती—

वाऱ्याच्या झोतानं पंखाची हालचाल झाली. वेडी आशा ! —हलक्या हातानं तिनं मैनेला हातांत घेतलं-तिचा प्राण केव्हांच तो छोटासा देह सोडून पार निघून गेला होता. गडी बोलत होता—'ससाण्यां टोंचून टोंचून मारल्या.'

तिनं बारकाईनें पाहिलं. चोंचीनं टोचून केलेल्या जखमा अगदीं ताज्या होत्या.

कोणी सांगावं ?-कदाचित् तिच्याच जातभाईनं तिला घायाळ केली असेल !

तिच्या डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रूंनीं मैनाचा देह भिजत होता.

जवळच उभ्या असलेल्या आपल्या बायकोला गडी सांगत होता- 'लई जीव होता बघ मैनेवर बाईसाहेबांचा ! घटका घटका बघत तिच्या-कडं- आज इतकी वरसं व्हती घरांत-'

'किती वर्षं झाली रे तिला ह्या घरांत आणून ?'-दाटलेल्या आवाजांत तिनं विचारलं.

'तुमचं लगीन झालं बाईसाहेब त्याच्या दोनचार दिवस अड्याल बघा- मला आठवतंया घरांत लगीनघाई चालली व्हती—'

एकंदरींत त्या घरांत-त्या सोनेरी पिंजऱ्यांत ती, मैना बरोबरच आल्या होत्या. पण आज !-त्या समदु:खी दोन जीवांपैकीं एक जीव कायमचा बंधमुक्त झाला होता.

तिला वाटलं–आतां आपलं असं जगांत कोणी कोणी राहिलं नाहीं—तिनं मैनेचा मृतदेह हृदयाशीं घट्ट धरला. कांहीं निर्जीव पंख गळून पडले!

\+ + + +

आणि ह्या प्रसंगानंतर ती अगदींच बेचैन झाली. कोंडलेल्या भावना कह्यांत ठेवणं आतां असह्य होऊं लागलं. कोंडलेल्या मनाचं दुःख उघडपणें बोलून दाखविण्यास जगांत तिला कुठेंच जागा नव्हती.

स्वतःचं दुःख दुसऱ्याला सांगून नाहींस होत नाहीं खरं, पण क्षणाचं फसवं समाधान का होईना, पण लाभतं खरं त्यामुळें. पण तें फसवं समाधानहि तिच्या नशिबीं नव्हतं.

मनाचं समाधान–तें मिळत नसतं, आपणच मिळवायचं असतं–आणि म्हणूनच तिनें तो मार्ग स्विकारला.

मनांत आलेलें विचार, आतुरता, सर्व कांहीं कांहीं ती कागदावर लिहून काढूं लागली. मनांतले विचार, ती तळमळ स्वतःच्याच हातानें लिहून काढल्यावर तिला घटकाभर समाधान वाटे–भारावलेलं मन हलकं होई!

आणि एक दिवस अकस्मात् मोहनला रस्त्यावरून जातांना तिनं पाहिलं. धांवतच ती दारांत गेली. एकच क्षण दोघांची दृष्टादृष्ट झाली–तिच्या दृष्टींतली ती आतुरता–मनाची तळमळ–! पण त्याच्या दृष्टींत? तिरस्कार आणि राग पुरापुरा भरला होता.

मोहन निघून गेला. त्यानें सोडलेल्या त्या विषारी बाणानें तिला पुरं घायाळ केलं. तिच्या हृदयाच्या चिंधड्या उडाल्या.

त्या दिवशीं ती दोन तास सारखी लिहीत होती. डोळ्यांतल्या अश्रूंनें मधलीं मधलीं अक्षरं पुसलीं जात. तिचं लिहीणं चालूच होतं.

मोहनला लिहिलेलं पण त्याला केव्हांही न पोहोंचणारं पत्र होतं तें. त्यांत नानातऱ्हेनें त्याची समजूत घालण्याचा तिनें प्रयत्न केला होता. क्षमेची याचना होती–त्याच्या भेटीसाठीं तिला लागलेली तळमळ आणि त्याचं स्पष्ट चित्र त्या पत्रांत तिनें स्पष्टपणें रंगवलं होतं.

पांढऱ्या कागदावर काळ्या शाईनें मनांतले विचार लिहून आर्य स्त्रिला न शोभणारं कृष्ण–कृत्य करीत होती ती–केवढं मोठं पातक होतं हें ! मनांतले विचार, भावना मनांतच खोलखोल दडपून ठेवायच्या असतात. त्या भावना, ते विचार बोलून दाखविण्यांत किंवा लिहून काढण्यांत केवढं मोठं पातक असतं हें तिला अजून कळायचं होतं !

—केवळ मनाच्या साधनासाठीं तिचा चाललेला हा खेळ...

\+ + +

' चालती हो–एकक्षण थांबू नकोस माझ्या घरांत–राक्षसीण–कुलबुडवी ' तिचे पती रागानें लाल होऊन गरजत होते. त्यांच्या हातांतलं तें कागदाचं पुडकं !–स्त्री–जातीला न शोभणाऱ्या कृत्याचा पुरावा तिनेंच स्वत:च्या हातानें करून ठेवला होता–आणि आज तो पुरावा तिच्या पतीच्या हातांत सांपडला होता.

'चालती हो–चालती हो म्हणतों ना. .' ती दरवाजांत थरथर कांपत उभी होती. पिंजऱ्याचा दरवाजा उघडला गेला होता. तिला बंधमुक्त केल्याचं प्रत्यक्ष तिचा नवरा तिला ओरडून ओरडून सांगत होता.

पिंजऱ्यांतून भरारी मारणारी ती मैना !–आवेगानें तिनें पाऊल उचललं–

चोचीनें मारून मारून घायाळ केलेली मैना दुसऱ्याच क्षणीं तिच्या नजरेपुढें आली.

तिचा तोल सुटला–ती जोरानें खालीं कोसळली–घराच्या पायऱ्या रक्तानें धुवून निघाल्या.

# नीलेची परीक्षा

" नीले; अजून जागीच का तूं ? अग दोन वाजून गेले ना..."

नीलेनें घड्याळाकडे पाहिलें–खरोखरच तीन वाजायला अवघीं दहाच मिनिटं होतीं–

" झालं ग आई–अगदीं थोडसं राहिलं आहे बघ, वाचायचं..."

" असलीं जाग्रणं करून ऐनवेळीं आजारी पडशील झालं–आणि मग परीक्षेच्या ठिकाणीं परीक्षा राहील."

—ह्यावर कांहींच उत्तर न देतां नीलेनें फक्त इतिहासाचं पान उलटलं. रोजचंच होतं हें. तिचा दोन दोन, तीन तीन वाजेपर्यंत अभ्यास संपत नसे– आणि तिची आई रोज रागावे तिला.

नीलेची ती मॅट्रिकची परीक्षा होती ! सबंध वर्गांत सतत बारा महिने पहिला नंबर ठेवणाऱ्या नीलेला वास्तविक इतका रात्रन्-दिवस अभ्यास करण्याची कांहींच जरुरी नव्हती–अगदीं थोडा अभ्यास तिला पास होण्याला पुरेसा होता. परंतु नुसतं 'पास' होण्यासाठीं नव्हती तिची धडपड— 'शिष्यवृत्ति' हवी होती तिला.

एका अत्यंत गरीब विधवेची मुलगी नीला–शिक्षणासाठीं तिच्या आईला रक्ताचं पाणी करावं लागत होतं !–आणि ही जाणीव नीलेच्या मनांत सतत असल्यानें तीही रक्ताचं पाणी करून अभ्यास करीत होती—

—शेवटीं परीक्षेचा दिवस उजाडला. भक्तिभावानें आईला नमस्कार करून धडधडत्या हृदयानें ती परीक्षेच्या ठिकाणीं येऊन पोहोंचली–वर्षभर अभ्यास करूनही मुलां-मुलींना हातांतलं पुस्तक सोडवत नव्हतं. पहिली घंटा तर पडली–अखेरची दृष्टी त्या पुस्तकावर फेकून सर्वांनीं नाखुषीनें आपलीं पुस्तकें बंद केलीं.

परीक्षेवर स्वारी करावयास निघालेल्या सैनिकांच्या घोळक्यांत नीला मोठ्या मुष्कीलीनें जिन्यावरून मार्ग काढीत एकेक पायरी वर चढत होती– अगदीं शेवटच्या पायरीवर नीला चढली–अकस्मात् तिच्याच पुढें चालणाऱ्या एका मुलाचें पेन तिच्या पायाजवळ पडलं. चटकन् तिनें तें उचलून दिलं– किती सहज घडली गोष्ट !

—सहजासहजीं घडलेली गोष्टहि कित्येकदां आयुष्याच्या नाशास तर कधीं उद्धारासहि कारणीभूत होत असेल नाहीं ?—

" Thank you ! "—त्या मुलानें स्वतःचें कर्तव्य बजावलें. नीलेचें मात्र लक्षहि नव्हतें त्याच्या बोलण्याकडे–केव्हां एकदां प्रश्नपत्रिका हातांत पडेल असं झालं होतं तिला.

—पेपर हातांत आला आणि संपलाहि–किती खुलला नीलेचा चेहरा ! किती किती छान लिहिला होता तिनें तो पेपर–मधल्या सुट्टींत भेटण्यास आलेल्या आपल्या आईला नीला सांगत होती–" किती छान होता पेपर

आई ! छान गेला बघ मला–" त्या माऊलीलाहि आनंद झाला–क्षणभरच कां होईना पण स्वत:च्या मुलीबद्दलचा अभिमान तिच्या मुखावर नकळत चमकून गेला—

—आणि होतीच मुळीं तिची लाडकी नीला तितकी हुषार !

दुपारचा पेपर लिहिण्यासाठीं प्रफुल्लित मुखानें नीलेनें परीक्षेच्या हाल-नांत प्रवेश केला–"Wish you good luck!"—जागेवर बसतां बसतांच तिच्या मागच्या मुलाचें उद्गार तिनें ऐकले–अगदीं नकळत तिनें मागें पाहिलें. ज्याचें पेन तिनें शेवटच्या पायरीवर उचलून दिलें होतें तोच तो मुलगा होता...

"Thanks"–ह्या शब्दासाठीं भुकेलेल्या त्या मुलाची–नव्हे तरुणाची नीलेनें निराशाच केली–कां ?–ती रीतरिवाज जाणत नव्हती ?–कीं तेवढें धैर्य नव्हतं तिच्या ठिकाणीं ?—मूर्ख नीला !

पेपर हातांत आला. अगदीं 'ढ' मुलाच्या तोंडावर हास्य चमकलं–नीला तर स्कॉलर !

दुसरा दिवस आला–कालप्रमाणें आजहि नीला आपला मार्ग काढीत होती–त्याच शेवटच्या पायरीवर त्याच मुलाच्या फाऊंटनपेननें नीलेचा पाय गांठला--क्षणभरच नीला बावरली–काय करावं तिला सुचेना. पेनचा मालक तें उचलून घेईल ह्या आशेनें तिनें वर पाहिलं.

—पेन उचलण्याचा थोडाहि प्रयत्न न करतां तो तिच्या मुखाकडे पहात होता—मागेंपुढें मुलामुलींची नुसती गर्दी, विचार करण्याची जागा नव्हती ती. चटकन् वांकून तें पेन त्याच्या हातांत दिलं !

"Thank you very much!" आज very much हे शब्द जास्त जोडण्यांत आले होते--कालच्यापेक्षां आजचा आवाज बोलतांना ज्यास्त मृदु करण्यांत आला होता.

—आभार प्रदर्शित करण्याइतकी अक्कल नीलेंत असती तर ?

परीक्षेनें तिसरा दिवस गांठला. पहिल्या दोन दिवसासारखा आज

कांहींच प्रकार घडला नाहीं. नीला सुटकेचा निश्वास टाकणार तोंच स्वतःच्या टेबलावर ठेवलेलें तेंच पेन तिनें पाहिलें—भित्री नीला ! किती दचकली !

पेपर लिहितांना सारखं तिचं लक्ष त्या पेनकडे जाई—" सुपरवायझरना बोलवून देऊं का त्यांच्याजवळ हें पेन ?"—क्षणभरच चमकून गेला हा विचार तिच्या डोक्यांत–पण कृतींत मात्र नाहीं उतरला तो–कमकुवत नीला ! किती दुबळ होतं निलेचं मन ! !

समोर पाहून पेपर लिहीत असतांना देखील मागच्या मुलाची दृष्टी आपल्याचकडे लागून राहिल्याची जाणीव तिला झाल्यावांचून रहात नसे–तिचे हात थरथरत.

तरी बरं, तिच्या डोक्यावरच विजेचा पंखा आपलें काम चोख बजावित होता.

कसवसा पेपर संपला. रोजच्या इतका सुंदर पेपर आज तिच्याकडून लिहीला गेला नव्हता. तरी पासापुरते मार्क सहज मिळण्यासारखा होता पेपर तिचा.

नीलेची अपेक्षा होती–दुपारीं मधल्या सुट्टींत तरी तें पेन तेथून उचललें गेलें असेल—पण छे !—पेनच्या मालकाला कोठें होती त्याची जरुरी ?—आणि इतर कोणाला तें चांगलें भारी किंमतीचें पेन उचलून घेण्याचा मोह नीलेच्या दुर्दैवानें पडला नव्हता !

—तिच्या कपाळावरच्या आठया न दिसाव्या इतका कांहीं तिच्या मागचा मुलगा आंधळा नव्हता...

केवढा हा अपमान ! तो एका लक्षाधीशाचा लाडका मुलगा–आणि नीला ?—एका गरीब विधवेच्या पोरीनें केलेला हा भयंकर अपमान, त्याच्या सहनशक्तीच्या बाहेरचा होता.

आजचा परीक्षेच्या शेवटचा दिवस. सायन्सचा पेपर राहिला होता फक्त आतां–भितीनें नीलेनें टेबलावर दृष्टी टाकली—कालचें पेन आज नव्हतें तेथें. निर्धास्त मनानें ती खुर्चीवर बसली होती ती जोरानें खालीं आदळली !—

खुर्चीचे स्क्रू काढल्यानें जो परिणाम होणार होता तो चुकला नाहीं. मुलांमुलींच्या हंसण्याचा निनाद केवढ्या मोठ्यानें उठला त्या मोठ्या हॉल-मध्यें !—नीलेच्या डोळ्यापुढें अंधारी आली–उठण्याचा तिनें प्रयत्न केला –नीट उठतांहि येईना तिला.

" लागलं कां जास्त ? "—सुपरवायझर प्रेमळ शब्दानें चौकशी करीत होते–उत्तर देण्याच्या मनःस्थितींत होतीच कुठं नीला ?—तिचें तें दूर जाऊन पडलेलें पेन, पेन्सील वगैरे सर्व वस्तु तिच्या हातांत देण्यांत आल्या–खुर्चीचे स्क्रू पुन्हां बसविण्यांत आले–खुर्ची हलवून सुपरवायझरनीं स्वतःची खात्री करून घेतली—

" हं बसा आतां—घाबरुं नका–" तिला धीर देण्याचा प्रयत्न सुपर-वायझरनी केला—नीला ! पेपर वाटण्यास सुरवात झाली ! मुलांमुलींचें मोठ्यानें हंसणें बंद झालें होतें. आतां तो " Bombay University " चा हॉल होता !—पेपर हातांत आला असूनहि कांहीं खट्याळ पोरें तिच्याकडे पाहून अजूनहि हंसत होती...

पेपर नीलेपुढें येऊन पडला—निर्जीव हातानें तो उचलूनहि घेतला–पेप-रवरची अक्षरं मात्र तिला दिसत नव्हती—तिनें प्रयत्न केला. कांहींच दिसेना. तिच्या डोळ्यांवर अश्रूंचा इतका दाट पडदा आल्यावर कोठून आणि कशीं दिसणार अक्षरं ?

त्या तीन तासांत मोठ्या प्रयत्नानें निलेनें तीन पानं लिहिलीं–सायन्सचा होता पेपर तो–शेवटची पांच मिनिटांची घंटा झाली–पेपरकडे किती निराशेनें पहात होती नीला ! तिच्या हातापायाचा कंप अजूनहि नव्हता थांबला.

पेपर घेण्याकरितां सुपरवायझर आले. तीन पानं लिहिलेला पेपर नीलेनें त्यांच्या हातांत दिला. चमत्कारीक दृष्टीनें त्यांनीं नीलेकडे पाहिलें--तिला त्याचा थांगपत्ताहि नव्हता–

शेवटीं त्यांनीं स्वतःच तिच्या पुढें जरा बाजूला पडलेला कोरा पेपर उचलून घेतला. पेपरवर नांवहि नव्हतं घातलेलं—

सुपरवायझरनीं सर्व कांहीं व्यवस्थित पेपरच्या मुखपृष्ठावर लिहून घेतलें-सायन्सच्या दोन विभागासाठीं दोन निरनिराळे पेपर्स लिहावे लागतात-किती लवकर नीलेच्या लक्षांत आलें हें !—स्कॉलर नीला !

शेवटचा पेपर संपलेला. त्यांतून पेपर अत्यन्त सोपा. किती खुलके होते सर्वांचे चेहरे !

बाहेर पडण्यासाठीं निला हलुहळू गर्दीतून वाट काढीत होती. ती दृष्टीस पडतांच तिच्या हॉलमधील कांहीं मुलें इतर मुलांच्या कानांत हळूच कांहींतरी कुजबुजत आणि मग दोघांच्या हांसण्याचा मिश्र ध्वनि तिच्या कानावर येऊन आदळे. मुलींनाही त्यांत भाग घेतल्यावांचून नाहीं रहावलं. फरक फक्त आवाजांत आणि हंसण्याच्या पद्धतींत—मुलींचं तें कोमल आवाजांतलं हास्य नीलेचं हृदय भेदून जाई...

किती जड पावलं पडत होतीं नीलेचीं आज घरीं जातांना ! एक मोटार अत्यंत वेगानें तिच्या अगदीं जवळून गेली—तिनें दचकून बाजूला पाहिलं-

तिच्या मागचा मुलगा—श्रीमंताचा बेटा मोटार चालवीत होता-नीलेकडे पाहून केलेलं तें विकट हास्य !—

किती छान सूड घेतला होता त्यानें नीलेचा. केवढा अपमान केला होता तिनें त्याचा !-

'Thanks' म्हणण्याइतकीहि माणुसकी तिनें त्याला दाखवली नव्हती-त्याचें तें भारी किंमतीचें पेन तिनें स्वीकारलें नव्हतें. उलट कपाळाला आठ्या !— एक का दोन किती चुका केल्या होत्या तिनें !!

उत्सुकतेनें वाट पहात असलेली तिची आई रोजच्याप्रमाणें आजही दारांत उभी होती—नीलेला भडभडून आलं...किती वेळची रडत होती नीला आईच्या मांडीवर पडून...

" उगीच वेड्यासारखं नको करूस नीले, थोडा तरी लिहीला आहेस ना तूं ?—नक्की पास होशील बघ—"

तिची आई तिचं सांत्वन करीत होती—वेडी आशा !

रिझल्ट लागला. ती आणि तिच्या मागचा तो श्रीमंताचा बेटा–दोघांचीहि नावं पास होणाऱ्या सुदैवी यादींतून गळलीं होतीं...

सायन्सची तीन पानं लिहून का कधीं होतं पास मॅट्रीकमध्यें !— अवघे बारा मार्क पडले नीलेला सायन्समध्यें !

कमकुवत, मित्र्या, मूर्ख नीलेला किती योग्य प्रायश्चित्त मिळालं होतं !

*　　　*　　　*

गेल्या वर्षींच्याहि रुबाबांत तो श्रीमंतचा बेटा नव्या मोटारींतून परीक्षेला निघाला होता—परीक्षा तीच, जागाहि तीच–फक्त त्याच्या पुढचा नंबर बदलला होता—त्या वेळीं त्या ठिकाणीं नीला नव्हती—

परीक्षा म्हणजे केवळ चैन होती त्याच्या दृष्टीनें–श्रीमंतांचा लाडका मुलगा तो–चैन करण्याकरितांच जन्माला आला होता !—आणि नीला ? 'शिष्यवृत्ति'साठीं धडपडणारी नीला आज कोठें होती ?— कोणाला ठाऊक !

---

# गारगोटी

तो एक प्रचंड वृक्ष होता पृथ्वीवरचा ! त्या तारका चिमुकल्याच, पण आकाशांतल्या आणि त्याच्या पायाजवळ पडलेला तो गारगोट्यांचा ढीग–हं बोलूनचालून गारगोट्या–त्यांना कसली किंमत ?—

वृक्ष !—नाविन्य—आणि नाविन्याचा उपभोग हेंच त्याचं ध्येय ! आकाशांत दैवी तेजानं चमकणाऱ्या त्या तारका पहातांच त्याचं देहभान हरपलं जाई—त्यापैकीं एखाद्या तारकेवर त्याची दृष्टी खिळून राही—

छे ! ते कांहीं नाहीं, कसंही करून ही तारका मिळवायचीच—तो मनांत दृढ निश्चय करी.

भावनावश आणि खुळ्या मनावर भुरळ घालण्याचे कितीतरी मार्ग त्याला अवगत होते ! कधींकधीं आनंदानें नाचून तो त्या तारकेचं लक्ष

आपल्याकडे वेधून घेई. ती त्याची हिरवीगार पानं अन् तीं हंसरी फुलं कशी अगदीं छान दिसत—खुळी तारका खुदकन् हासे. तो मनांत खूष होई—बस्स. जिंकलं ! कधीं कधीं उदासिनतेचे सोंग घेऊन दुःखाचं नाटक तो रंगवी—हळवी तारका ! तिला वाटे—आपल्याबांचून आतां हा जगणं शक्य नाहीं—माझ्यासाठीं हा मरणार ! केवढं हें दिव्य प्रेम ! ! आणि त्या 'दिव्य–प्रेमाची' ओळख पटतांच ती त्याच्यावर आतुरतेनें झेप घेई.

कांही ध्येयवादी अन् मानी तारका मात्र त्याचं तें नाटक पाहून माना फिरवीत—नाकं मुरडीत. पण तो निराश होत नसे. त्यांचा प्रयत्न चालूच राही.

आणि मग त्या मानी, ध्येयवादी तारकांना देखील त्याची भुरळ पडे. त्यांचा तोल सुटे. त्या खालीं येत.

आपल्या जिवाच्या जिवलगाला भेटायला येणारी ती तारका क्षणांत 'गारगोटी' होई.

आणि आकाशांत दैवी तेजानें चमकणाऱ्या किती तरी तारका गार-गोट्यांच्या रुपानें त्याच्या पायाजवळ पडल्या होत्या ! ती तारका आणि ही गारगोटी तो खदखदा हंसू लागे. "छट् ! मला गारगोटी नको–मला तारकाच पाहिजे."

तो पुन्हा आकाशांत शोधू लागे. आकाश कसं अगदीं तारकांनीं फुललेलं. हं ती गेली तर ही दुसरी—त्याचा क्रम अव्याहत चालू होता. त्याच्या पायाशीं गारगोट्यांचा नुसता सडा पडत होता. गारगोट्यांचा ढीग पहातांच तो तिरस्कारानें मान फिरवी.

दुर्दैवी गारगोट्या लज्जेनं खालीं माना घालीत. कधीं कधीं त्यांची नजर आकाशांत लुकलुकणाऱ्या तारकांवर वळे. त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर लोटे—"एकेकाळीं आपणहि त्या निळ्या—निळ्या आकाशांत अशाच चमकत होतो—आणि आतां !" पश्चात्तापानं त्यांची तोंड काळीनिळी होत. "काय केलं हें आपण ?"

प्रत्येक गारगोटी आपल्याच दुःखांत निमग्न. आजूबाजूला तिचं लक्षच

जात नाहीं. पण त्यांतहि—त्या मेलेल्या तारकांतली—एक जिवंत गारगोटी निघाली. स्वत:चं दु:ख विसरून तिनं आजुबाजूला पाहिलं. तिच्यासारखे शेकडों दु:खी जीव तिथं तडफडत होते. त्यांत नित्य नवीन भर पडत होती. तिनें निश्चय केला—"ठरलं! कांहीं करून त्या मूर्ख वृक्षाला चांगलाच धडा शिकवायचा. दुसऱ्या तारकांचा होणारा नाश थांबवावयाचा."

तिनें आपला निश्चय दुसऱ्या एका गारगोटीला बोलून दाखविला.

आपल्याच प्रियकरावर—प्रीतिच्या परमेश्वरावर सूड! तिच्या सर्वस्वाचा नाश त्यानें केला होता आणि तरीही त्याचा सूड घेण्याचा विचार तिला पाशवी वाटला. तें पाप–भयंकर पाप करण्यास ती तयार होईना. पहिल्या गारगोटीनें तिची खूप समजूत घातली—विनवणी केली पण व्यर्थ! तिनें तर वृक्षाला धडा देण्याचा निर्धारच केला होता. पण तें काम तिच्या एकटीच्या हातून नव्हतं होणारं. तिनें फिरून प्रयत्न करण्याचा विचार केला. आपला विचार तिनें तिसऱ्या गारगोटीला सांगितला. तिलाही प्रथम तिचा तो विचार पाशवी–अमानुष वाटला. पण नित्य घेतले जाणारे बळी पहतांच तिचं मन पालटलं—"निदान त्या अल्लड तारकांचा नाश थांबवण्यासाठीं तरी—"

एकच क्षण–

क्षणार्धांत त्या दोन गारगोटयांतून एक दिव्य ठिणगी निघाली. तिची ज्योत झाली–आणि पहातां पहातां ज्योतीची ज्वाला झाली.

वृक्ष आकाशांतल्या एका नवीन अल्लड तारकेला भुलविण्याच्या प्रयत्नांत गुंतला होता.

ज्वालेच्या स्पर्शाबरोबर त्याचं लक्ष पायाकडे गेलं. क्षणांत सारा प्रकार त्याच्या लक्षांत आला. गयावाया करून तो दयेची याचना करूं लागला. गारगोटीची किंमत त्याला कळली–पण फार उशिरा. दया दाखविणं आतां गारगोटीच्या हातीं नव्हतं राहिलं. अग्नि भडकला. ज्वाला आकाशापर्यंत भिडूं लागल्या. क्षणार्धांत प्रचंड वृक्षाची राख झाली.

—आकाशांत तारका लुकलुकत होत्या

× × ×

केवढा तरी अफाट महासागर तो. स्वतःच्या उदरांत दडलेल्या मौलीक रत्नांची जिथं त्याला जाणीव नव्हती तेथं तळाशीं पडलेल्या असंख्य गारगोटयाकडे त्याचं लक्ष जाणारं कसं !–त्याच्या त्या उचंबळलेल्या हृदयांत स्वतःची छाया पहातांच क्षणाचाहि विलंब न करतां त्या खुळ्या तारका त्याच्यावर झेप घेत—

रोज गारगोटयांत नवीन तारकांची भर पडत होती. मेलेल्या प्राण्यांच्या सांगाड्यामध्यें त्या गारगोटया वर्षानुवर्षे तशाच पडून होत्या. एक दिवस त्यांना बातमी लागली—पृथ्वीवर एका प्रचंड वृक्षाची राख गारगोट्यांनीं केली. अविचारी गारगोट्या—त्यांनीही निश्चय केला–त्या मूर्ख विश्वासघातकी सागराला अगदीं अस्साच छान धडा शिकवायचा—आणि मग !–सूडाच्या नुसत्या कल्पनेनंच त्यांना केवढा तरी आनंद झाला !

अग्नि तर निर्माण झाला–उत्सुकतेनें गारगोट्या पाहूं लागल्या–पण–सागर आपला हंसतच होता–सगळ्या गारगोट्या एक झाल्या.

त्यांनीं फिरून प्रयत्न केला–अग्नि भडकला–आणि–सारं जग उत्सुकतेनें पाहूं लागलं—

महासागराच्या उदरांतला अग्नि–त्याचं तें एक भूषणच ठरलं !

गारगोट्या अजूनहि प्रयत्न करीत होत्या—त्यांत रोज नवीन गारगोट्यांची भर पडत होती–आणि सागर आपला हंसतच होता—

---

# उकिरडा

गांवांतला तो सर्वांत मोठा चौक खरा, पण त्या कोपऱ्यावर येतांच बायका आपला पदर नाकाला लावीत. पुराण-पुरुष उपरण्याच्या टोकानं नाक दाबून धरीत. आणि कांहीं आधुनिक तरुण-तरुणी आपला सुवासिक रुमाल नाकापुढें फडफडवीत.

गांवांतला सर्वांत मोठा उकिरडा तो. आठ आठ दिवस तो उकिरडा साफ करण्यांत येत नसे. आणि मग अंगावर शहारे आणणारी ती दुर्गंधी !

गांवच्या नगरशेटचं निधन—आणि त्यांतून मृत्युसमयीं लक्ष्मी-नारायणाचं मंदीर बांधण्यासाठीं दिलेली पन्नास हजारांची देणगी. तीन दिवस अख्खा बाजार बंद ठेवण्यांत आला. ठिकठिकाणीं दुःख प्रदर्शनार्थ

सभा भरल्या. गोरगरिबांचं रक्त शोषून श्रीमंत झालेले शेटजी आतां दानशूर–धर्मवीर ठरले. ज्यांच्या घरावरून शेटजीनीं नांगर फिरवला होता ते लोकहि शेटजीच्या औदार्यानें दिपून गेले—अनन्यभावानें शेटजींच्या आत्म्याला शान्ती देण्याबद्दल परमेश्वराची करुणा भाकूं लागले.

लक्ष्मी–नारायणाच्या मन्दीरासाठीं योग्य जागा शोधण्यास सुरुवात झाली. आणि शेवटीं सर्वानुमतें गांवांतला तो मोठा चौक पसंत करण्यांत आला.

अर्थांच तास—आगीच्या ज्वाळा भडकल्या. उकिरडयाचा अवतार संपला !

बाकी शेटजींचा दत्तक पुत्रहि खरा कर्तव्यनिष्ठ ! अवघ्या दोनच महिन्यांत लक्ष्मी–नारायणाच्या मंदीरावर सोन्याचा कळस चढविण्यांत आला. प्रत्येकाचे हात भक्तिभावानें जोडले जात होते. मंदिरांतल्या चन्दन–उदबत्त्याच्या सुवासानें दाहीदिशा दरवळून जात होत्या. दोनच महिन्यापूर्वी त्या ठिकाणीं येतांच नाकाला पदर लावणारी माणसं आतां तेथली धूळ कपाळाला लावीत होते.

दूर उभी राहून त्या मंदीराकडे कौतुकानें पहाणारी ती ऐंशी वर्षांची म्हातारी स्वत:शींच खोल आवाजांत पुटपुटली—

—'उकिरडयाचं पांग फिटलं !'

× × ×

गांवांतली ती माणसांची वस्ती–नव्हे उकिरडा मात्र अजूनहि तस्साच कायम होता. त्यांत किडया मुंग्याच्या मोलानं जगणारी आणि मरणारीं माणसं जगाच्या ध्यानींमनींहि नव्हती.

गांवांतला माणूस अगदीं नाइलाज झाला तरच त्या वस्तीवरून जाई–डोकं भणाणून टाकणारी ती घाण—वर्षेन् वर्षे गेली तरीही तशीच होती.

गांवांतल्या एका उकिरडयाचे पांग फिटले होते–पण ह्या दुसऱ्या उकिरडयाचें पांग....

दगडाचं मंदीर बांधणाऱ्या–दगडाला देव बनविणाऱ्या एकाहि कर्तृत्ववान् माणसाचं लक्ष ह्या उकिरड्याकडे–त्यांतल्या हालत्याबोलत्या प्राण्यांकडे जात नव्हतं.

आणि जोपर्यंत मंदीर बांधणं, माणसांनीं देवमाणूस बनणं, किंवा देव बनविणं हाच जीवनाचा खरा विकास ठरत होता, तोपर्यंत उकिरडा अस्साच कायम राहणार होता. ह्या उकिरड्याचंहि नंदनवन होईल. पण केव्हां ?

माणसानं देव बनण्याचा, बनविण्याचा प्रयत्न सोडून खराखुरा मनुष्य होण्याचा प्रयत्न केला तरच !

---

# भिंतीपलीकडे

आणि दुसरे दिवशीं सकाळीं दहा वाजतां मी 'बी. बस' स्टँडवर उभी होते. मनाचा पक्का निश्चय झाला होता. बस आली. निश्चयानें मी बसमध्यें चढले. उजव्या बाजूला जागा असूनहि मी आज मुद्दाम डाव्या बाजूची खिडकी पसंत केली. कसल्यातरी आस्तुतेनें माझे डोळे रस्त्यावर कांहींतरी शोधीत होते. बस जात होती. आतां सोनापूरची ती काळी उंच भिंत दिसू लागली. मनांतली आतुरता वाढूं लागली. अगदीं उत्सुकतेनें मी रस्त्याकडे पहात होते. पण अजूनहि मला जें पाहिजे ते दिसत नव्हतं.

सोनापूर समोरून बस जात होती. मी निराशेनें खालची नजर वर केली. आकाशाला भिडणारा तो धूर...थोडं आधी आलें असते तर ?—

माझंच मन—माझेच विचार—पण केवढी दचकलें मी ! जें दिसूं नयें म्हणून गेली दोन वर्षं मी त्या रस्त्यावरून गेलें नव्हते. आणि आज नेमकं तेंच दिसावं म्हणून माझी धरपड चालूं होती.

ती उंच भिंत—विमनस्कपणें मी त्या भिंतीकडे पहात होतें. ती भिंत इतकी उंच नसती तर—त्या भिंतीपलीकडे जळणारं प्रेतहि पहाण्यास आज मी मागेंपुढें पाहिलं नसतं—केवढं निर्ढावलं होतं माझं मन !

माझ्याच मनाचा थांग मला लागेना. माझीच मला चीड आली. कां—कां असं व्हावं ?—माझ्याच मनाचं भेसूर चित्र मी आज पहात होतें. माझाच मला तिरस्कार वाटला !—पण माझं मन एवढं निर्ढावलं तरी कसं ?—राहून राहून माझं मलाच नवल वाटत होतं—

गेल्या दोन वर्षांतले प्रसंग माझ्या डोळ्यापुढून जात होते......

× × ×

“ अगबाई अकरा ! चल ना आतां ह्या बसनेंच. चल—चल ग ” दुरून येणारी बस पहातांच मालती मला ओढूं लागली—पण मी जाग्यावरून हालले नाहीं.

“ असं ग काय—चल ना—आपण जाईपर्यंत पहिली ‘इनिंग’ संपेल देखील. आतांचा खेळ बघण्यासारखा होणार आज–आजचा एकच दिवस चल ना–“ अगदीं काकुळतीला येऊन मालती बोलत होती.

“ येतेस ना ? ” मालती आशेनं माझ्याकडे पहात होती. मी मानेनेंच नकार दिला.

“ तुझं एक कांहींतरीच हं वसु, एक दिवस आलीस ह्या बसनी म्हणून मरणार नाहींस कांहीं तूं—प्रत्येक वेळीं आपलाच हट्ट—” एवढ्यांत बस येऊन स्टँडवर उभी राहिली. अजूनहि मालतीला थोडी आशा होती—“ चल ग—आजचा एकच दिवस. ” माझा हात धरून ती ओढूं लागली. जरा जोरानेंच मी तिच्या हातांतून हात काढून घेतला.

" तू जा. मी नाहीं येणार ह्या बसने." बस निघून गेली. हिरमुसल्या चेहेऱ्यानें मालती उभी राहिली.

आणि तब्बल पंधरा मिनिटांनीं 'सी' रुट बस आली. स्टेडियमवर पोहोचे-पर्यंत एकमेकीशीं चकार शब्द बोललो नाहींत आम्हीं. मालतीचं भविष्य खरं ठरलं शेवटीं. जाग्यावर बसता बसतांच टाळ्यांचा कडकडाट झाला; आणि आम्ही समोर पाहिलं. दोन्ही उत्तम खेळाडू परत आपल्या तंबुकडे निघाले होते.

तो सबंध दिवस एकमेकीशीं एक शब्दहि न बोलता घालवला. मालती जरा घुश्शातच होती. माझ्याहि रागाचा पारा बराच चढला होता. मालतीला ठाऊक का नव्हतं कीं, मी बी रुटच्या बसनी कधींही जात नाहीं ते—आणि तरीही तिचा आजचा आग्रह. मूर्ख ! माझं तरी काय अडलय् तिच्याशी बोलायला—

तसाच तो दुसरा प्रसंग—

× × ×

" थांब "—बसमध्यें चढण्यासाठीं निघालेल्या मंगलेला मी मागें ओढलं.

" म्हणजे ? " आश्चर्यानें मंगला माझ्याकडे पहातच राहिली.

" मी ह्या बसनें येणार नाहीं. "

" अग पण आधींच आपल्याला उशीर झालाय. जाईपर्यंत बँक बंद देखील होईल—चल ग ह्या काय नि त्या काय कुठल्या तरी बसनें जायचं–चल. "

" मी येणार नाहीं. " प्रत्येक शब्द निश्चयांतून निघत होता. बस निघून गेली.

" हा ग कसला तुझा हटवादीपणा—आतां जाईपर्यंत—" पण माझ्या चेहेऱ्याकडे लक्ष जातांच ती स्तब्ध राहिली.

आधीच उशीर झालेला; त्यांतून सी बसनें बराच लांब पडणारा रस्ता—बँक दहाच मिनिटापूर्वी बंद झाली होती.

" झालं आतां तरी मनासारखं—चांगली पहिल्या बसनी आली असतीस

तर—आतां सोमवारखेरीज पैसे नाहीं मिळणार मला—काय बिघडत होतं त्या बसनी आली असतीस तर?" मी मध्येंच ओरडलें—"तुला किती पैसे पाहिजेत?—सोमवारपर्यंत पुरतील एवढें—" आणि रागाच्या भरांत दोन नोटा मी तिच्या आंगावर फेकल्या.

"अशी ग काय चिडतेस—सहज बोलले मी—रागवलीस?" हळव्या मंगलेचे डोळे भरून आले. त्या नोटा तिनें निमुटपणें माझ्या पर्समध्यें परत ठेवल्या.

परत येतांना मंगला विचारीत होती—"पण वसू तूं त्या बसनी कां नाहीं आलीस?—कांहीं कारण आहे होय?" मी मानेनेंच होकार दिला. अगदीं लहानसहान गोष्टींहि खुलासेवार सांगणारी मी—अर्थातच आजहि मंगलेनं तीच अपेक्षा केलीं. होती—पण आज एका शब्दानेहि मी खुलासा केला नाहीं—खिडकींतून मी बाहेर पाहूं लागलें.

* * *

आणि असेच कितीतरी प्रसंग आले आणि गेले. मी माझा निश्चय मोडला नाहीं. चुकूनहि मी बी रूट बसमध्यें चढले नाहीं; आणि ह्याला कारण?–तसच मोठं होतं.

त्या वेळीं मी अगदीं नवीनच आलें होतें मुंबईत. बसमधून कुठं तरी जात होते मी त्या दिवशीं. नेहमीच्या संवयीप्रमाणें मी वर गेलें आणि खिडकी जवळची जागा पटकावली. बाहेर पहातां पहातां सहजच माझी नजर खाली गेली. एकच क्षण—चटकन् मी माझी नजर काढून घेतली. पण अंगावर आलेले शहारे मात्र कांहीं क्षण तसेच राहिले. तें भेसूर दृश्य!

दोन चार क्षण निघून गेले. आणि पुन्हा नकळत माझी नजर खालीं गेली. पहिल्याच प्रसंगाची आवृत्ति—पण पहिल्यापेक्षांहि भयानक—भेसूर! माझ्या हातापायाला कंप सुटला. चेहेरा गोरामोरा झाला आणि बसमधून खाली उतरेपर्यंत मी बाहेर म्हणून पाहिलं नाहीं; आणि त्या दिवसापासून सोनापूरावरून जाणाऱ्या बीरूट बसमध्यें चुकूनहि चढले नाहीं.

अगदीं लहानपणापासून माझ्या मनांत ती भीति मूळ धरून होती. रस्त्यावरून जातांना एकदां प्रेत पहातांच माझ्या हातापायाला कंप सुटे-घशाला कोरड पडे-मात्र तशाहि स्थितींत कांपऱ्या हातानें त्या मृत देहाला नमस्कार करण्यास विसरत नसे मी !

वास्तविक वाढत्या वयाबरोबर ती भीति कमी व्हायला पाहिजे होती. पण तसं झालं नाहीं.

माझी भीति—त्यांतला फोलपणा मनाला कळत होता—बुद्धीला पटत होता—पण—

कित्येकदां माझ्या ह्या भित्र्या स्वभावावर माझ्या मित्रमैत्रिणीकडून टीका होई. आणि स्वत:ची पडती कमकुवत बाजू सावरण्याचा मी तितक्याच कसोशीनें प्रयत्न करी—

"मला भीति नाहीं वाटत; पण मला नाहीं आवडत असले प्रकार पहायला. आहे काय त्यांत ?-नाहींतर ती सुधा, नुसती तरफडते प्रेत पहायला— शी ! अमानुष, क्रूर, जंगली नाहींतर—"

× × ×

"तें बघ"—मी वळून पाहिलं. क्षणांत माझ्या कपाळावर आठ्यांचं जाळं पसरलं. मालतीच्याहि लक्षांत तिची चूक आली. "तस नाहीं—पण प्रेताचा शकून चांगला असतो म्हणे-बघ आज तूं नक्की परीक्षेंत पास होणार" मी मध्येंच ओरडले "पुरे ग तुझं--मूर्ख नाहीं तर !"

मात्र अभ्यास झालेला नसतांनाहि त्या दिवशींचें दोन्ही पेपर्स चांगले गेले. हॉस्टेलमध्यें आलें तेव्हां मी जरा खुषीतच होतें.

"कसे गेले पेपर ?" खोलींत पाऊल टाकतांच मालतीनं विचारलं.

"छान !"

"बघ मी तुला सांगितलं नव्हतं कीं, प्रेताचा शकून फार चांगला—" हातांतली पुस्तकं संतापानें मी टेबलावर फेंकली-मालती गप्प राहिली.

ह्या गोष्टीला चार महिने लोटले होते. आतां माझी विद्यापिठाची परीक्षा सुरु झाली होती. आधींच संस्कृत माझा नावडता विषय. त्यांतून अभ्यास न झालेला; खूपच भिती वाटत होती. आणि शेवटीं जें व्हायचं तें झालं— सात प्रश्नापैकीं अवघे तीनहि प्रश्न मला नीटपणें सोडवतां आले नाहींत. निराश मनानें मी परतलें. आजुबाजूला कुठेच माझं लक्ष नव्हतं. कमीत कमीं संस्कृतमध्यें किती मार्क मिळतील याचाच विचार माझ्या डोक्यांत चालू होता. पण इतक्यांत कसल्यातरी चाहुलीनें मी बाजूला पाहिलं आणि चटकन् मान फिरवली.

आणि त्याचवेळीं चार महिन्यापूर्वींचा तो सहामाही परीक्षेच्या वेळचा प्रसंग आठवला. त्यावेळींहि अभ्यास नव्हता झालेला; पण किती छान गेला होता संस्कृतचा पेपर–मालती म्हणाली होती–प्रेताचा शकुन...

खरंच का प्रेताच शकून चांगला असतो ?–छे ! कांहींतरीच–वेडी समजूत !

आणि तरीहि मी स्वत:लाच नकळत ट्रॅममधून वळून पाहिलं. तो सातआठ लोकांचा जमाव आतां दृष्टीआड गेला होता.

आणि दुसरें दिवशीं—

बी रुट बस नी परीक्षेचं ठिकाण लांब पडत असूनहि मी बस स्टॅंडवर उभी होतें—

आजुबाजूला माझी दृष्टी कांहीं तरी शोधीत होती—

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ...७५७५... नों. दि ..............
वि. ...क/२५१... क्र. .. ..............



IRBK-0101717